
# 'प्रतीक्षा' उज्ज्वल पर्वासाठी !

संपादक : प्रा.महेन्द्र सेठिया



ज्ञान प्रबोधिनीच्या
छात्र प्रबोधन विभागाचे
प्रकाशन

# छात्र प्रबोधन

## स्वरूप व सद्य:स्थिती

❖ **ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठीचे मासिक**

- कुमारांच्या भावविश्वाशी निगडित कथा, कविता,
- ललित लेख याचबरोबर ज्ञान-विज्ञान-कृती अशा
- सर्वांगीण विषयांना स्पर्श करणारे मासिक !
- प्रारंभ शके १९१४ (इ.स.१९९२)

❖ **नामवंत व नवोदित लेखकांच्या साहित्यकृतींनी समृद्ध मासिक**

- लागोपाठ ५ वर्षे उत्कृष्ट दिवाळी अंकांचे विविध पुरस्कार.
- महाराष्ट्र, बेळगाव, गोवा मिळून ३५ शहरे आणि ७० तालुके
- यांमध्ये मिळून ४०,००० पेक्षा अधिक वाचक.
- आजपर्यंत सुमारे १५,००० विद्यार्थी सभासद झाले.
- स्वत:ची अक्षर जुळणीची सुसज्ज संगणकीय यंत्रणा.

❖ **स्थानिक स्वयंसेवी कार्यकर्त्यांद्वारा कार्यरत केंद्रे**

- १० ठिकाणी उपक्रम केंद्रे
- २० ठिकाणी नोंदणी केंद्रे
- ४० ठिकाणी वितरण केंद्रे

❖ **मासिकाच्या सभासदांसाठी विविध उपक्रम**

- ग्रामीण जीवन परिचय शिबिर व गिरिभ्रमण.
- नेतृत्व प्रशिक्षण शिबिर, अभ्यास शिबिर.
- अभ्याससहली, सायकल सहली.
- व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर, विज्ञान शिबिर.
- साप्ताहिक उपक्रम, सहली, प्रासंगिक मेळावे.
- राखी, शुभेच्छापत्र निर्मिती व विक्री उपक्रम.
- सुमारे ८,००० विद्यार्थी विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले.

❖ **युवक-प्रौढ सदस्यांसाठी विविध उपक्रम**

- प्रबोधिनी परिचय सहल संयोजक प्रशिक्षण शिबिर
- शिक्षक प्रशिक्षण शिबिर पालक सभा व मेळावे
- आजपर्यंत ३,५०० व्यक्तींचा विविध उपक्रमांत सहभाज

❖ **विविध शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन**


- आतापर्यंत २४ पुस्तके व तीन ध्वनिफितींची निर्मिती.

**ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रणालीच्या व प्रयोगांच्या**
**विस्तारांचे, प्रसाराचे एक प्रभावी माध्यम !**

# 'प्रतीक्षा' उज्ज्वल पर्वासाठी !

## या पुस्तकात दडलंय काय ?


३. पुढच्या वर्षी लवकर या! – सुभाष देशपांडे
५. कथा – पेरुच्या बागेतील रहस्य (भाग १) – नीता जोशी
९. मोकळं आकाश – शैलजा देशमुख
११. तुम्हाला माहीत आहे का?
१२. कविता पानोपानी –
माझ्या अंगणात – बजरंग सरोदे, झाड मोठं अजबच असतं – विद्या प्रभू
१३. कथा – मित्रांची भेट – अनु. उमा बापट
१५. कोकणी जत्रेची रात्र – रवीन्द्र पिंगे
१७. मराठीचा बोलु – मीनाक्षी कठाळे
१९. कथा – स्वधर्मे निधनं श्रेय: । – सुहासिनी देशपांडे
२३. वाचलेच पाहिजे असे काही – बारा गावचं पाणी
२५. मोठा दिवस–छोटा दिवस – अरविंद परांजपे
२७. माय डायरी... न लिहिलेली – नीलिमा बोरवणकर
२९. करून तर पाहा ! – कोकीळ शिट्टी – मधुकर अभ्यंकर
– फुलपाखरु – संगीता केळकर
३०. प्रोत्साहन – संजीवनी बोकील
३१. रेषांचा खेळ – मल्हार अरणकल्ले



'प्रतीक्षा' उज्ज्वल पर्वासाठी !

**प्रकाशक–मुद्रक :** श्री. महेन्द्र सेठिया, प्रमुख, छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे–३०

**संगणक–अक्षरजुळणी :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे–सजावट :** श्री. गिरीश सहस्रबुद्धे

**स्वामित्व :** ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

**प्रथमावृत्ती :** सौर भाद्रपद २० शके, १९२२, ११ सप्टेंबर २०००

**किंमत :** रु.१०/–

**संपादन**
**प्रा. महेन्द्र सेठिया**

**छात्र प्रबोधन,**
**ज्ञान प्रबोधिनी,**
**५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**


*रिमझिम पावसात ऊन सोनेरी कोवळे। निळ्याभोर आभाळात, सात रंगांचे सोहळे।।*

**छात्र प्रबोधन ... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

# हितगुज

*या पुस्तक मालिकेतील हे तिसरं अन् अखेरचं पुस्तक! कारण ज्याची 'प्रतीक्षा' करत होतो तो टप्पा आता जवळ येऊन ठेपलाय (किती जवळ, ते आज सांगणं अवघड ! पण तरी लवकरच !) पुढची वाटचाल उज्ज्वल अन् गतिमान होईल यात शंकाच नाही. मात्र या पुस्तकासाठी तुम्हाला कराव्या लागलेल्या प्रतीक्षेबद्दल मनापासून क्षमस्व!*

*बऱ्याच वेळा आपल्याला अनेक गोष्टींची 'प्रतीक्षा' करावी लागते.... वाट पाहावी लागते... कधी ती एखाद्या प्रिय व्यक्तीची असेल, एखाद्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या पदार्थाची, वस्तूची असेल, कधी एखाद्या संधीची-यशाची-बक्षिसाची वाट पाहणं असेल तर कधी एखाद्या प्रसंगाची... दिवसाची... अनुभवाची असेल. मनात एक उत्कंठा दाटलेली असते. काहीशी अधिरता जाणवते... अस्वस्थता शिगेला पोहोचते... इतर काही ती सुचू देत नाही... खरं ना ! हा अनुभव विविध वेळी कमी-अधिक प्रमाणात आपण अनेकांनीच घेतला असेल.*

*अशा अनेक प्रसंगांमध्ये अनेक जण मात्र हातावर हात ठेवून, काहीही कष्ट न करता, सगळा हवाला दैवावर-नशिबावर सोडून, निष्क्रियतेने वाट पाहात बसतात. त्यांच्या वाटेला आयुष्यभर वाट पाहाण्याशिवाय फारसं काही येत नाही.*


*'जो झोपतो त्याचं नशीब झोपतं अन् जो चालतो त्याचं नशिबही चालतं' अशा अर्थाचं एक संस्कृत सुवचन आहे. तेव्हा नुसती वाट पाहात बसण्यापेक्षा जो धडपडतो, अडी-अडचणींना युक्तीने सामोरा जातो, त्याला अनेक गोष्टी हस्तगत करता येतात. असं असलं तरी प्रत्येक धडपडणाऱ्या, कर्तृत्ववान व्यक्तीला, त्याला हवी असलेली प्रत्येक गोष्ट, प्रत्येक संधी, हवी तेव्हा मिळतेच असं मात्र नाही. अनेक गोष्टी अनेक व्यक्तींवर, यंत्रणांवर, परिस्थितीतील घटकांवर, निसर्गातल्या घडामोडींवर अवलंबून असतात. सचोटीने व्यवहार करून, त्यांची साथ मिळवण्याची खटपट करतानाच काही काळ धीर धरावा लागतो, फार अस्वस्थ होऊन चालत नाही, आशावाद टिकवून ठेवावा लागतो. हे ज्यांना जमतं त्यांना ही 'प्रतीक्षा' एका उंचीवर नेऊन ठेवते. पुढील वाटचाल करण्यासाठी अधिक बळ अन् उत्साह मिळवून देते.*

*आपल्या सर्वांनाही वेळोवेळी अनुभवाला येणारी 'प्रतीक्षा' त्यानंतर येणाऱ्या उज्ज्वल पर्वाची नांदी ठरावी यासाठी शुभेच्छा !*

**महेन्द्र सेठिया,**
**प्रमुख, छात्र प्रबोधन,**
**ज्ञान प्रबोधिनी, पुणे.**

# पुढच्या वर्षी लवकर या !

- श्री.सुभाष देशपांडे.



गणपती हा एकच देव असा आहे की त्याला निरोप देताना ''पुढच्या वर्षी लवकर या !'' असे आपण मनापासून म्हणतो. गणेशोत्सवाचे दहा दिवस कसे निघून गेले, याचं दहाव्या दिवशी आश्चर्य वाटत राहातं. पूर्वतयारीसाठी त्या जागवलेल्या रात्री, कॉलनीत मुला-मुलांचा गणपती बसविण्यासाठी केलेली आरास, हट्ट करून मिळविलेल्या वर्गण्या, एका आवाजात सगळ्यांनी भक्तिभावानं म्हटलेली आरती आणि रोजच्या प्रसादाबाबत असलेली उत्सुकता ! चौकातल्या ढाण ढाण आवाजावर बदलणाऱ्या रोषणाईतील गणपतीपेक्षा आपला लहानसा गणपती, आपल्या मनातलं सगळं कसं समजावून घेतो आणि त्यामुळेच हा जिगरी दोस्त चक्क निरोप घ्यायला लागतो तेव्हा आपले डोळे पाणावतात. घरचा गणपती दीड दिवसापासून सातव्या दिवसापर्यंत-केव्हाही गेला तरी सार्वजनिक गणेशाचं 'उत्सवपण' अनंत चतुर्दशीपर्यंत वातावरणात भरून राहिलेलं असतं.

गावातली सार्वजनिक मिरवणूक म्हणजे तर धमाल असते. वेगवेगळ्या गावाला, मिरवणूक सुरू किती वाजता झाली आणि संपायला किती वाजले, याचे वेळेचे आकडे ऐकायला गंमत वाटते. कुठे सकाळी नऊला सुरू अन् संध्याकाळी सातला संपते तर कुठे दुपारी बाराला सुरू झालेली मिरवणूक संपायला दुसऱ्या दिवशीचे सकाळचे नऊ वाजतात ! पुण्याचा हा कित्ता गेली अनेक वर्षे तसाच गिरवला जातोय. महाराष्ट्रातल्या इतर गावांनी त्यांचे अनुकरण नाही केले तरच नवल !

पण अनुकरण चांगल्याचे फार सावकाश होते आणि वाईटाचे लवकर. मिरवणूक ठरलेल्या वेळी सुरू करावी, याची पठडी पडायला वेळ लागणार आणि डोक्याला पट्टी बांधून गुलालात थोबाड माखून, अचकट विचकट नाचण्याची स्पर्धा मात्र सगळेजण लवकर शिकतात.

खरं तर नाचण्यात काय चूक आहे? रोज रोज आपलं चार भिंतीत मख्ख चेहऱ्यानं वर्गात बसून 'शिस्त पाळा' या घोषणेचा कंटाळा नाही येत? हल्ली तर बँडच्या तालावर लग्नाच्या मिरवणुकीत भलेभले नाचताना दिसतात. मग आवडत्या नटनट्यांची आठवण काढून गाण्याच्या ठेक्याला दाद देत थोडा वेळ बेहोष झालं म्हणून काय बिघडलं?

नाचणं ही तर आपली परंपरागत आणि वैभवशाली कला आहे. फक्त त्याचा प्रकार डोळ्यांना आणि मनाला आनंद देणारा असावा आणि हिडीसपणाची भावना वाटू नये. ''नाच गं घुमा, नाचू मी कशी'' म्हणत खेळणाऱ्या मुली, एकमेकींचा आनंद वाढवतात, तर डोक्याला फुगे बांधून भररस्त्यावर अंगविक्षेप करणाऱ्या मुली, इतरांना लाजवतात.

मग नृत्याचे अवघड प्रकार फक्त स्टेजवरच्या कलाकारांसाठी राखून ठेवायचे काय? तर मुळीच नाही. लोकनृत्याचे शेकडो प्रकार आपल्याकडे प्रचलित आहेत. एकत्र गट करून ढोल-ताशांच्या गजरात घुमणारी घाटी लेझीम, केवळ सोळा जणांचं जोरकस, झांजपथक जेव्हा खणखणू लागतं, तेव्हा लखलखणारे त्यांचे गोंडे काय बहारदार असतात!

हल्ली काही गावांमधून अनेक शाळांतील मुलं-मुली भगवा ध्वज नाचवीत, ढोल-ताशे आणि झांजा

यांच्या तालावर 'बरची नृत्य' करताना दिसतात. त्यांचं नाचणं किती सुडौल असतं ! जोरकसपणे सगळ्या शरीराला आणलेली वाढती लय म्हणजे हे बरची नृत्याचे हात ! प्रबोधिनीनं पुण्यातल्या गणेशोत्सवात ते पासष्ट साली सुरू केलं आणि आता त्याचं महाराष्ट्रभर आपापल्या पद्धतीनं अनुकरण होतंय. मगाशी म्हटलं ना, चांगल्या गोष्टीचं वळण पडायला वेळ लागतो म्हणून ! शंभर-शंभर मुलं एका गणवेषात एका तालावर जेव्हा बरचीनृत्य करतात तेव्हा येणारी धुंदी काही औरच असते. अशी तडफ दाखविण्यात मुलीही काही कमी नाहीत, बरं का !

कोळी नृत्य, काठीनृत्य, भांगडा यासारखे सामूहिक नृत्यप्रकार मनाला मोकळेपणा देतात. पोषाखीपणा दूर सारतात पण सभ्यपणा सोडत नाहीत. आपल्याला अशी समूहनृत्य गणपतीच्या मिरवणुकीत हवीत, डिस्कोचे, कॅबेरेचे ठेके नकोत. तीन माकडांचे संदेश आठवा-वाईट पाहणार नाही, वाईट ऐकणार नाही आणि वाईट बोलणार नाही. गणेशाशप्पथ !

चांगलं काम मिरवणुकीच्या धकाधकीत करायचं म्हटलं, तर गर्दीचा मुकाबला कसा करायचा, हे शिकावं लागतं. आपण स्वत: गर्दीत हरवायचे दिवस संपले असले (नक्की ना?) तरी आणखी लहान मुले हरवू नयेत म्हणून मदत करणे शक्य आहे. तसंच, ऐन दुपारच्या वेळी खेळून किंवा वाद्ये वाजवून दमलेल्या कार्यकर्त्यांसाठी पाण्याची व्यवस्था करता येईल. कुणाला लागलं-खरचटलं तर प्रथमोपचार पेटी अशा ठिकाणी उपयोगाची.

मिरवणुकीत आपण जेव्हा खेळत असतो, तेव्हा आपल्याच नादात असतो. गर्दीचा रेटा मागे सारायला कधी कधी हातातली बर्ची उगारली जाते. पण तो तिचा उद्देश नाही. लोक व आपण दोघेही मिरवणुकीचे भाग असतो. शिवाय आपण काही पुढाऱ्यांना शोभा आणणारे भाडोत्री ताफेवाले नसतो, तर युवाशक्तीचा एक स्वाभाविक आविष्कार करणारे देशभक्त- म्हणून गणेशभक्त असतो. सार्वजनिक ठिकाणचं आपलं वावरणं ऐटबाज हवं- फोटोसाठी नव्हे तर स्वत:च्या व सगळ्यांच्या आनंदासाठी. दमलो तर बेंगरूळपणे गटात विस्कटायचं नाही. हात करत नाचण्याऐवजी मधून मधून नुसतं चालायचं. संपूर्ण मिरवणूक संपेपर्यंत ध्वज जसा खाली ठेवत नाहीत, तसा आपला सहभागही सलग हवा.

आपल्या बाळ-गोपाळ मंडळाची आणि चौकातल्या दादा मंडळाची सांगड घालायला हवी. छोट्या मूर्ती प्रत्यक्ष विसर्जित होतात आणि मोठ्या मात्र झाकून परत आणल्या जातात. ''आपल्या छोट्या मूर्ती विसर्जनाचा संस्कार करून दान करून टाका, नदीचे प्रदूषण टाळा'' असे एका संघटनेने आवाहन केले आहे. वर्षभर साठविलेल्या निर्माल्याची पिशवी नदीत उपडी करण्याची हीच संधी न मानता त्याचे सेंद्रिय खत, घरच्या कुंड्यांसाठी करायला तुम्ही एव्हाना शिकला असाल.

विसर्जन कशाचे करायचे? आपल्या मनातील आळसाचे, टाकाऊ रूढींचे आणि बेहिशेबी गुंडगिरीचे. वर्गणीचा हिशोब कागदावर लिहून सर्व संबंधितांना दाखवायचा. उत्सव साजरा करण्यात ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले, त्यांना धन्यवाद द्यायचे, त्यांनी तुम्हाला स्वत:हून म्हटले पाहिजे - ''पुढच्या वर्षी लवकर या !''

***

**- श्री. सुभाष देशपांडे,**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

**हळूच हसाऽऽऽ !**

* एक पुस्तक-विक्रेता आपल्या दुकानात आलेल्या विद्यार्थ्याला म्हणाला, ''हे पुस्तक जर विकत घेऊन तू ते चांगलं वाचलंस, तर भूगोल विषयात तुला १०० पैकी ५० गुण तरी हमखास मिळतील.'' यावर तो विद्यार्थी म्हणाला, ''असं? शेट मला त्या पुस्तकांच्या दोन प्रती द्या, म्हणजे प्रतीमुळं ५० याप्रमाणे मला त्या विषयात १०० पैकी १०० गुण मिळून जातील.''
* गुरुजींनी शाळेत प्रश्न केला, ''आप्पू, रावणाचा वध कुणी केला रे?'' आप्पू म्हणाला, ''राम जाणे ! मी असल्या खून-मारामाऱ्यांच्या नसत्या चौकशीत चुकूनही कधी लक्ष घालत नाही.''

# पेरूच्या बागेतील रहस्य

- नीता जोशी

''पल्लवी, आईऽ, संपली एकदाची परीक्षा ! आता सुट्टीच सुट्टी, याऽऽहू !'' सगळा बंगला दणाणून सोडत पराग घरात शिरला आणि आईच्या गळ्यात पडला.

''अरे ! हळू जरा. आधी पेपर कसा गेला ते सांग.'' पण आईशी बोलायला पराग थांबलाच नाही. तो सरळ त्यांच्या बागेत गेला. तेथे त्याची जुळी बहीण, पल्लवी त्यांच्या कुत्र्याशी खेळत होती.

''पल्लू, एक टेरिफीक आयडिया आहे. चल, लगेच आपण सगळ्या ग्रुपला फोन करून बोलवूया. पण एकदम टॉप सिक्रेट ठेवायचं हं हे.'' पल्लवी आणि परागचं चांगलं मेतकूट जमायचं. त्यामुळे ती आई-बाबांना काही सांगणं शक्यच नव्हती. पण पेपरहून आल्या आल्या परागच्या डोक्यात कुठली भन्नाट आयडिया आली असेल याचा विचार करत तिने सगळ्यांना फोन केले. सौमित्र, विवेक, रूपाली, रश्मी आणि चिन्मय हे त्यांचे खास दोस्त. सगळ्यांच्या घरीही त्यांच्या मैत्रीबद्दल कौतुक होतं. सौमित्रचे वडील आणि त्याचे इन्स्पेक्टर काका, मुलांना नेहमीच प्रोत्साहन द्यायचे. त्यामुळे त्यांनी अनेक सहली बरोबर केल्या होत्या. त्यांची खरोखरच गाढ मैत्री होती. चिन्मयच्या घराशेजारीच एक रिटायर्ड मेजर राहायचे, मेजर आनंद रास्ते. १९६५ च्या युद्धात त्यांच्या उजव्या पायाला जबरदस्त दुखापत झाल्यामुळे तो पाय कापून टाकावा लागला होता. पण त्यांना त्याचे दुःख कधीच झाले नाही. उलट त्यांना अभिमानच वाटायचा. त्यांना मिळालेली शौर्यपदके त्यांनी दिवाणखान्यातल्या शो-केसमध्ये नीट मांडून ठेवली होती. त्यांच्या रिबीनसुद्धा अगदी ताठ होत्या. मखमली पेटीतली पदके सगळ्यांचं आकर्षण होती. चिन्मयला त्यांच्या घरी जाऊन आल्याशिवाय चैनच पडत नसे. आजही परीक्षा संपल्यावर तो सरळ त्यांच्या घरी गेला. ''काका, परीक्षा संपली. आता घरी अजिबात जाणार नाही. आधी गोष्ट. ती आसाममध्ये असताना नक्षलवाद्यांशी तुमची चकमक झाली होती ती गोष्ट. Please सांगा ना.''

''अरे जरा धीर धर. हे लिंबू



सरबत घे आणि इतक्यावेळा ऐकूनही पुन्हा तीच गोष्ट ऐकणार? ती गोष्ट ऐकू शकतो.'' ''बरं बाबा.'' शेवटी काकांकडून दोन गोष्टी ऐकल्यावरच तो घरी आला. घरी आल्या आल्या आईने त्याला परागचा निरोप सांगितला.

''आई, पण मी तन्मयला नाही नेणार हं. त्याची लुडबूड होते आम्हाला.'' तन्मय चिन्मयपेक्षा अडीच वर्षांनी लहान होता. त्यामुळे चिन्मय कधीही त्याला घेऊन जात नसे.

''अरे, तो तुझा भाऊ आहे. त्याला असं नाही करायचं. जा आत्तातरी त्याच्याबरोबर खेळ.'' ''ठीक आहे.'' म्हणून चिन्मय सटकला.

इकडे पल्लवीने आईला पोहे करायला मदत केली आणि दोघे जण सगळ्यांची वाट पाहात बसले. ठरल्याप्रमाणे पाच वाजता सगळे जमले. ''अरे! पहिल्याच दिवशी तुमची बैठक जमली वाटतं. घरी नीट सांगून आलात ना?'' परागच्या आईने विचारलं.

''हो काकू आणि आता तर आम्ही रोजच भेटणार आहोत.'' रूपाली म्हणाली. आई गेल्यावर परागने सगळ्यांना त्याच्या खोलीत नेले. दार बंद करून तो अतिशय गंभीरपणे म्हणाला. ''सगळ्यांनी नीट ऐका. यंदाची सुट्टी आपण नुसती खेळण्यात घालविण्यापेक्षा काही वेगळं करुयात. आज आपण एक गुप्तहेर संघटना स्थापन करूया. फक्त आपण सात जण या संघटनेचे सभासद

आहोत. आपण कान आणि डोळे उघडे ठेवून कोठेही काही संशयास्पद आढळते का, याकडे लक्षय द्यायचं. काहीही लक्षात आलं तर लगेच सभा बोलवायची आणि मग आपण सर्वानुमते ती कामगिरी हातात घ्यायची.''

"Great" न राहून विवेक ओरडला. ''मला शेरलॉक होम्स व्हायला नक्की आवडेल.''

''ए, पण अशा गोष्टी खूप कमी वेळा घडतात आणि आपल्यापर्यंत येणाऱ्या, आपल्याला कळणाऱ्या, तर खूपच कमी असतील,'' रूपाली म्हणाली. ''मान्य, म्हणून आपण विधायक कामंही करायची आहेत. उदा. दिवाळीच्यावेळी आपण फटाक्यांच्या पैशातून पुस्तके घेऊन आपल्या ग्रंथालयाला दिली, तशीच आणखी कामं करायची'' परागने त्याची कल्पना मांडली. ''अरे ! ऐका. आजच पेपरमध्ये आलं आहे. आपल्या पेरूच्या बागेत अनेक पक्षी स्थलांतर करून आले आहेत. उन्हाळ्याचा हा महिनाच ते पक्षी स्थलांतर करतात. पण काही क्रूर मुले उगाचच त्यांना दगड मारून जखमी करतात. असे दोन पक्षी आज आढळले. आपण त्या क्रूर मुलांना चांगला धडा शिकवूया.'' सौमित्र म्हणाला. ''ही खरंच मस्त आयडिया आहे. आपण त्यासाठी बागेत एक छोटीशी सहल काढूया.'' पल्लवी आनंदून म्हणाली. "Done" पराग म्हणाला. ''आता अजून एक सूचना. शेरलॉक होम्स हा आपला परवलीचा शब्द आहे. जेव्हा काही महत्त्वाचं सांगायचं असेल तेव्हा हा शब्द सांगून सभा बोलवायची. म्हणजे सगळ्यांना पूर्वकल्पना मिळेल.''

''हे सगळं ठरलं तर मग! पण आता आपण सभा विसर्जित करूया आणि उद्या बरोबर तीन वाजता इथेच जमूया.'' विवेक म्हणाला. ''पण उद्या येताना काही नवीन कल्पनांचा विचार करून या.'' पराग उठत म्हणाला.

एकमेकांना अच्छा करून ते घरी निघाले; पण प्रत्येकाच्या डोळ्या-समोर गुप्तहेर संघटनेच्या अनुषंगाने अनेक गोष्टी साकार होत होत्या.

**फार मोठा धक्का.**

दुसऱ्या दिवशी चिन्मयला जाग आली ती आजूबाजूला चाललेल्या गडबडीमुळे. चिन्मय खिडकीतून डोकावला तर आनंदकाकांच्या घरासमोर पोलिसांची गाडी दिसली. काय झालं ते पाहण्यासाठी तो पळतच बाहेर आला.

''चिन्मय, आधी आत जा. बाहेर पोलिस चौकशी करत आहेत, तू तिथे लुडबूडू नकोस.'' बाबांनी दटावले. ''पण झालं काय? पोलिस का आले आहेत बाबा?'' ''अरे काल रात्री आनंदकाकांकडे चोरी झाली. त्यांची सगळी शौर्यपदके चोराने पळविली. त्याला बाकी काही चोरायला बहुतेक वेळ मिळाला नाही.'' बाबांची वाक्ये ऐकून चिन्मयला धक्काच बसला.

''बाबा, त्या चोराला पोलिस पकडतील ना? ती पदके म्हणजे आनंदकाकांचं सर्वस्व होती. आता त्यांना काय वाटत असेल?'' चिन्मयला खूपच वाईट वाटत होतं.

चिन्मयचं सगळं लक्ष आनंदकाकांच्या घराकडे होतं. त्याचं सगळं आटोपून झालं तरी पोलिस गेले नव्हते. तेवढ्यात रूपाली त्याच्याकडे आली. ती सहजच आली होती. पण शेजारी पोलिसांची गाडी बघून तिला फार आश्चर्य वाटलं. चिन्मयने तिला चोरीची बातमी सांगितल्यावर तिलाही मोठाच धक्का बसला, परागला ही बातमी कळवून, आजच्या बैठकीत या महत्त्वाच्या बातमीबाबत चर्चा करायचं त्यांनी ठरवलं आणि पोलिस गेल्यावर लगेचच रूपाली आणि चिन्मय आनंदकाकांकडे गेले. दिवाणखान्यातली ती रिकामी शो-केस बघून चिन्मयला कसं तरीच झालं. सगळं कसं एकदम उदास वाटत होतं. अगदी काकांचा फोटोही. त्या रिकाम्या जागेत कालपर्यंत अगदी रिबीनसुद्धा ताठ असलेली पदके होती. ''आनंदकाका, तुम्हाला कोणाचा संशय येतो आहे का? कोणी बरं केलं असेल हे काम?'' चिन्मयने अधीरतेने विचारलं.

''नाही रे ! माझा कोणावरही संशय नाही. पण माझी शौर्यपदके चोरण्याची इतर कोणाला काय गरज, हेच मला कळत नाही? माझ्यासाठी ती पदके म्हणजेच माझं सर्वस्व आहे. एकेकाळी मी गाजवलेल्या मर्दुमकीची ती साक्ष होती. माझ्याकडे त्यांच्याशिवाय काहीच नव्हतं रे आणि आता रिकामी केस.'' बोलता बोलता आनंदकाकांच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. चिन्मय आणि

रूपालीला काय करावं तेच कळेना. त्यांनी आत्तापर्यंत कोणत्याही मोठ्या माणसाला रडताना पाहिलं नव्हतं आणि आनंदकाकांसारख्या शूर माणसाला तर नाहीच नाही.

''काका, प्लीज, प्लीज, काका रडू नका. मी त्या चोराला नक्की पकडेन आणि तुमची पदके परत मिळवीन.'' चिन्मय भावनातिरेकाने बोलून गेला.

''खरंच मुला, तू नक्की हे काम करशील. तूही माझ्यासारखाच शूर आणि हुशार मुलगा आहेस.'' स्वत:ला सावरत आनंदकाका म्हणाले ''मी आता पोलिस स्टेशनमध्ये जातो आणि चोराला पकडून देणाऱ्याला १०,००० रुपयांचं बक्षीस लावतो. बघू बक्षिसाच्या आशेने तरी माझी पदके तो चोर परत आणतो का? जा बाळांनो तुम्ही घरी जा.'' असं म्हणून काका बाहेर पडले. ''१०,००० रुपये, बापरे ! एवढी मोठी रक्कम काका कशी काय देणार कोण जाणे?'' दोघांनाही प्रश्नच पडला. चिन्मयला दुपारी भेटायची आठवण करून देऊन रूपाली घरी गेली.

पावणेतीन वाजताच पराग आणि पल्लवी त्यांच्या खोलीत सर्व तयारी करून बसले होते. तेवढ्यात खाली बेल वाजली. पाठोपाठ जिन्यावर पावलं वाजली. सौमित्र आणि विवेकनं दार ठोठावलं. ''शेरलॉक होम्स.'' परवलीचा शब्द दोघांनी एकदमच सांगितला आणि ते आत आले. त्यांच्या पाठोपाठ चिन्मय आला. ''शेरलॉक होम्स.'' आत येताच



त्यानेही शब्द सांगितला. ''शेरलॉक होम्स.'' रूपाली आणि रश्मीही लगेचच आल्या. सभेला सुरुवात करत परागने सगळ्यांना माहिती दिली, की, ''रूपालीचा सकाळी फोन आल्यावर, मी सौमित्रला फोन करून, त्याच्या इन्स्पेक्टर काकांकडून या चोरीची अधिक माहिती आणायला सांगितली. सौमित्र तू तुझ्या काकांना भेटलास का?'' परागने विचारले. ''मी तुझा फोन आल्यावर लगेचच पोलिस स्टेशनमध्ये इन्स्पेक्टर काकांकडे गेलो. तिथे त्यांनी सांगितले की आनंदकाकांकडे कोणीतरी भुरट्या चोराने चोरी केली असणार. ज्याने चोरी केली तो एकतर खूप लहान मुलगा असावा. पण ती शक्यता फारच कमी आहे; कारण सगळ्याच मुलांना आनंदकाका खूप आवडतात. बहुतेक ज्याने चोरी केली तो खिडकीतून आत आला असणार; कारण खिडक्या खूप मोठ्या आहेत आणि त्यातून सहज आत जाता येतं. पण ती शो-केस मात्र कोठेही न मोडता उघडली आहे. त्याचं लॉक फक्त उजव्या दाराला असलेल्या लहान भोकात हात घालूनच उघडता येतं. त्यामुळे त्या चोराचे हात फार छोटे असणार. नाहीतर ही चोरी शक्यच नाही. त्यांना पण खूप आश्चर्य वाटत होतं.'' सौमित्रने त्याची माहिती सांगितली. ''पण त्या चोराने आनंदकाकांना फार

दु:खी केलंय. अरे, तेवढ्यासाठी त्यांनी १०,००० रुपयांचं बक्षीसही जाहीर केलं आहे. मात्र एवढं बक्षीस देणं शक्यच नाहीये. आपण त्यांना मदत केली पाहिजे.'' चिन्मय म्हणाला.

''आता आपल्याला फक्त एकच गोष्ट करता येईल, ती म्हणजे सगळ्या गावात बारीक लक्ष ठेवायचं. आपल्या संघटनेबाबत कुणालाच काही माहीत नसल्यामुळे आपला कोणालाच संशय येणार नाही. त्याचा फायदा करून घ्यायचा. चोर ती पदके नक्की कोठेतरी लपवून ठेवेल. कारण पोलिस तपास थांबेपर्यंत तो ती बाहेर काढू शकत नाही.'' परागने त्याचे विचार मांडले. ''अगदी बरोबर, मी रोज काकांना भेटत जाईन आणि त्यांचा तपास कोठपर्यंत आला याचा आढावा घेईन.'' सौमित्र म्हणाला. ''माझी काकू चिन्मयच्या व आनंदकाकांच्या जवळ राहाते. मी आणि रश्मी तिकडे जाऊन आसपास नजर टाकू.'' रूपालीने तिची कल्पना मांडली.

''चालेल, मी, पल्लवी आणि विवेक गावात आणि नव्या बाजारपेठेच्या इकडे लक्ष ठेवू.'' परागने कामाची वाटणी केली.

''आणि मी आनंदकाकांच्या घरी जाऊन पुन्हा एकदा नीट पाहाणी करतो, कोठे काही धागादोरा मिळतो का पाहातो?'' चिन्मय म्हणाला.

''ठरलं तर मग ! आता आपण आपापली जबाबदारी पार पाडू आणि परवा बरोबर तीन वाजता इथेच भेटू. तशीच काही माहिती मिळाली तर परवलीचा शब्द सांगून बैठक बोलवू. नाहीतर सोमवारी पुढच्या कार्यक्रमाची जुळणी करू.'' परागने समारोप केला.

बाहेर पडताना आपण काय करूया म्हणजे चोर सापडेल, याचेच विचार प्रत्येकाच्या मनात घोळत होते. ठरल्याप्रमाणे रश्मी आणि रूपाली, तिच्या काकूकडे गेल्या. पण एक तास बसूनही त्यांना काहीच नवीन माहिती मिळाली नाही. शेवटी त्या बाहेर पडल्या. तिथून जवळच, गावात नवीन सुरू झालेल्या भाऊसाहेब पवार इंजिनिअरींग कॉलेजची बिल्डिंग होती. कॉलेजचं होस्टेलही तेथे होतं. तेथपर्यंत एक लांब चक्कर मारून काहीच नवी माहिती न मिळाल्यामुळे निराश होऊन त्या आपल्या घरी परतल्या.

सौमित्र पोलिस स्टेशनमध्ये गेल्यावर खरंतर काका त्याच्यावर चिडलेच. ''अरे, तू पुन्हा कशाला आलास? आम्ही आमचं काम करतच असतो. मला आता अजिबात वेळ नाहीये. पळ आता घरी.'' सौमित्रही फारच हिरमुसला होऊन घरी परतला.

दोन दिवस असेच गेले. सगळ्यांनी खूप प्रयत्न करूनही त्यांना काहीच नवीन माहिती मिळाली नाही. चिन्मय तर त्याच्या खिडकीतून हाललासुद्धा नव्हता. शेवटी सोमवारी पावणेतीन वाजता नाईलाजाने उठून तो परागकडे निघाला.

''चिन्मय तू सुरुवात कर. दोन दिवसात काय झालं?'' सगळे जमल्यावर परागने विचारलं.

''काहीच नवीन नाही.'' चिन्मयने उदास स्वरात सांगितले.

''विवेक तुझी काय बातमी आहे?'' परागने शेवटी त्याला विचारले.

''आपण एक गोष्ट करू शकतो. सध्या असं गुप्तहेराप्रमाणे काम करण्यापेक्षा, आपण आधी ठरल्याप्रमाणे पेरूच्या बागेत सहल काढूया. जरा ताजेतवाने होऊ. या क्रूर मुलांनाही पकडू म्हणजे आपला हुरूपही वाढेल. कारण अशी नुसतीच पाळत ठेऊन काहीही उपयोग होणार नाही. दोन, तीन दिवस गेल्यावर आपण पुन्हा एकदा सुरुवात करू,'' विवेक म्हणाला.

''मला पण विवेकचं म्हणणं पटतंय.'' पल्लवीने दुजोरा दिला. ''मग ही सूचना सर्वांना मान्य आहे का?'' परागने विचारले. ''चालेल. आपण उद्याच तेथे जाऊ.'' चिन्मय सोडून सर्वांनी त्याला दुजोरा दिला.

''चिन्मय तू असा उदास होऊ नकोस. आपल्याला ह्यातून नक्की काहीतरी धागादोरा मिळेल.'' परागने त्याला समजावले. बागेत काय काय करायचे, त्या मुलांना कसे पकडायचे, याची चर्चा करून सगळे जण आनंदात बाहेर पडले. पण...

**पेरूच्या बागेत नेमकं काय घडलं? ते वाचूया या कथेच्या पुढील भागात !**

(क्रमश:)

✻✻✻

**– नीता जोशी**
१५ बी/५, पश्चिमानगरी,
कर्वेनगर, पुणे – ५२.
**चित्रकार –** संतोष देवे

# मोकळे आकाश

शैलजा देशमुख



**नु**कताच दहावीच्या परीक्षेचा निकाल लागला. राहुल चांगला ८९% गुण मिळवून उत्तीर्ण झाला. राहुलचे बाबा, डॉक्टर ! आपल्या मुलानंही आपली गादी पुढे चालवावी, डॉक्टर व्हावे, ही त्यांची इच्छा !

''काय राहुल, मग 'सायन्स'ला प्रवेश घ्यायचा ना?'' बाबा मोठ्या खुशीत होते. आईही आता राहुलला चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार म्हणून खुश होती.

''बाबा, मला नाही सायन्सला जायचं. मार्क्स चांगले मिळाले तरी माझा जीव, गणित-शास्त्राच्या अभ्यासात रमत नाही. त्यापेक्षा मी 'आर्टस'ला गेलो तर?-- मला भाषा विषय खूप आवडतात. M.A. करून मग Ph.D. करायचंय मला!''

''अरे राहुल, तुला काय अवदसा आठवली ही...चांगले गुण मिळूनही! इतर मुलं बघ !'' बाबांचा चरफडाट. भविष्याचं छानसं चित्र राहुलच्या डोळ्यांसमोर उभं करायचा त्यांनी प्रयत्न केला. पण राहुल मात्र आपल्या विचारांवर ठाम उभा !

कुणाला हा अविचार वाटेल. पंधरा वर्षाच्या मुलाला काय भलंबुरं समजतंय, असंही वाटेल. वडिलांचं तो ऐकत नाही, उद्धट आहे, अशीही कुणाची प्रतिक्रिया होईल. पण मला मात्र राहुलचं खरंच मनापासून कौतुक वाटलं. स्वत:ला काय हवं ते त्याला चांगलं कळत होतं अन् ते मिळवण्यासाठी झगडायची त्याची तयारी होती.

बी.ई. झालेल्या सुनीलने काही वर्षांसाठी खेड्यात जाऊन काम करायचं नक्की केलं- खरंतर घरची परिस्थिती काही खूप चांगली नव्हती. त्याच्या बरोबरीची मुलं, चांगल्या नोकरीत स्थिर होत होती. पण सुनीलला तसं करावंसं वाटलं नाही आणि आपल्या आतल्या आवाजाशी प्रामाणिक राहायचा निर्णय त्याने घेतला.

नुकतीच एम.डी. झालेली दीपा जेव्हा, लग्नात अवास्तव खर्च होऊ देणार नाही, असं ठाम आग्रहाने आपल्या आई-वडिलांना सांगत राहिली, तेव्हा तिच्या डोळ्यातली स्वतंत्र विचारांची चमक काही औरच होती.

लग्न झाल्यावर, घरात, मुलाबाळात, सासु सासऱ्यांचं करण्यात, घरकाम करण्यात एम.एस्सी झालेल्या वर्षानं रमून जावं, अशी अपेक्षा करणाऱ्या घरच्यांचा विरोध सोसून, वर्षा कामासाठी बाहेर पडली घर आणि करिअर सांभाळण्याची कसरत करू लागली.

ही सगळी उदाहरणं डोळ्यांसमोर असताना मनात विचार येत होता- स्वातंत्र्यासाठीचा झगडा, जीवनात वेगवेगळ्या आघाड्यांवर असाच चालू नसतो का?

साधं जन्माला येताना, जगात मोकळा श्वास घेता यावा म्हणून स्वतंत्र होण्यासाठी धडपडतं, रडतं आणि जन्म घेतं. सुटी पावलं टाकता यायला लागली की एक-दोन वर्षांचं लहानगं बाळ आधाराविना घरभर एकटं चालायला धडपडतं.

तीन-चार वर्षाच्या, शाळेत नुकतं जाऊ लागलेल्या मानसीला कुणी, ''पिंकी, पाहुण्यांना गाणं म्हणून दाखव ना !'' असं म्हटलं की छोटी मानसी हमखास बंड करते; मुद्दाम गप्प राहाते. काय म्हणून दरवेळी तुम्ही सांगितलंत की मी गाणं म्हणायचं? असाच जणू तिचा आविर्भाव असतो.

बारा-तेरा वर्षांच्या नितीनला तर 'हे करू नकोस; इकडे जाऊ नकोस; लवकर परत ये; बरोबर मित्र कोण आहेत, हे खाऊ नकोस' इत्यादि गोष्टींवरचा आईचा पहारा म्हणजे चक्क आपल्या स्वातंत्र्यावर घाला, असंच वाटत असतं. शाळेतील, घरातील शिस्त म्हणजे कोंडवाडा, असं वाटायला लागतं. पंख फुरफुरत असतात; काही साहस करावेसे वाटत असते. --- पण सगळीकडे नजरांचा पहारा ! आकाशात उडणारे पक्षी पाहाताना वाटतं; 'आपल्यालाही असेच पंख असते तर ----- आपणही हवी तेव्हा स्वतंत्र भरारी मारली असती.

''पण नितिन, कधी नीट, बारीक नजरेनं पाहिलंयस का, आपल्याला मुक्त उडताना दिसणारे पक्षीसुद्धा काही शिस्त पाळत असतात.

खळखळ वाहाणाऱ्या नदीलाही दोन्ही बाजूंनी किनाऱ्यांचा बांध असतो. मनाला मोह घालणाऱ्या संगीतालाही सात सुरांचं बंधन असतं. मुक्त छंदात आहेसं वाटणाऱ्या कवितेलाही आतून एक ताल असतो.''

आता हे मात्र खरं. आपला सूर, आपला ताल निवडायचं स्वातंत्र्य आपल्याला हवं. किनाऱ्यांच्या सीमांनी मर्यादून न जाता फक्त बेबंदपणाला आळा घालत जायला हवा. नाहीतर खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचा अर्थच आयुष्यात कळेनासा होतो. स्वत:चे विचार निर्भयपणे मांडण्याचं धैर्य आपल्याजवळ असायला हवं. तुम्ही आतून निर्भय व्हा, मगच खऱ्या मुक्तीचा, स्वातंत्र्याचा अर्थ आपल्याला कळेल; स्वातंत्र्याचं स्वच्छ निळं आकाश तुम्हाला दिसेल. मात्र त्यासाठी भल्याबुऱ्या विवेक, मनाची परिपक्वता आणि निर्भयपणा हवा.

स्वातंत्र्याची माणसाची ओढ सनातन आहे. जेव्हा जेव्हा माणसाच्या आचारविचारांवर बंधनं आली तेव्हा-तेव्हा तो बंड करून उठला. जगातील सर्व क्रांत्यांचे इतिहास तेच सांगतात. एवढंच काय, धर्मविचारांचे नको इतके जाचक बंधन निर्माण झाल्यावर, त्याविरुद्ध आवाज उठवणारे बंडखोर समाजात निर्माण होत असतात.

काव्याच्या आशयविषयांना रचनेला बंदिस्तपणा येत गेला की एखादा 'केशवसुत' गर्जना करतो

*अशी असावी कविता म्हणुनी*
*तशी नसावी कविता म्हणुनी*
*सांगावया कोण तुम्ही कवीला?*
*आहात मोठे पुसतो तुम्हाला?*

आणीबाणीच्या काळात विचार-स्वातंत्र्यावर घाला आल्यावर, दुर्गाबाई भागवतांसारखी एखादी 'दुर्गा' साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून आवाज उठवते. देश पारतंत्र्यात असताना सर्वस्वाचा होम करून देशाला स्वतंत्र करण्यासाठी अनेक देशभक्त सज्ज होतात. या सर्वातून काय जाणवतं? स्वातंत्र्याची माणसाची ओढ त्याला स्वस्थ बसू देत नाही. त्यासाठी प्रीती, कीर्ती, संपत्ती कशाचेही मोल मोजायची त्याची तयारी असते. फक्त स्वातंत्र्याचा खरा अर्थ मनात जागा हवा हेच खरं !

***

**- शैलजा देशमुख**
इ/७, गुरुराज हौ.सोसा.,
पद्मावती, पुणे - ३७.

---

ज्ञान व्यवहाराचे

## ट्रॅव्हलर चेक

मित्रांनो, सुट्टीजवळ आली की आपल्याला गावाला जायचे वेध लागतात ना? प्रवास लांबचा असो किंवा जवळचा, प्रवास खर्चासाठी पैसे हे लागतातच. त्यामुळे आईच्या, बाबांसकट सगळ्यांना सारख्या सूचना! गाड्यांना गर्दी आहे, खिसे पाकीटं सांभाळा, बॅगेतले पैसे नीट ठेवलेत ना? बॅगेला कुलूप लावलंय ना? एक ना दहा काळज्या आणि एवढी काळजी घेऊनही पैसे हरवले किंवा चोरीला गेले की सहलीचा आनंद संपल्यातच जमा. शिवाय सहलीसाठी जास्त पैसे बरोबर असतात; म्हणजे नाही म्हटलं तरी आपल्या जीवालाही धोका! हे सगळं टाळण्यासाठी बँकांनी आपल्यापुढे मदतीचा हात केला आहे. नुसतं सहलीसाठी नाही तर उद्योगधंदे-नोकरीसाठी-शिक्षणासाठी हल्ली आपल्याला प्रवास करावा लागतो. अशावेळी बरेच पैसे बरोबर घेण्यापेक्षा बँकेनी उपलब्ध करून दिलेली 'ट्रॅव्हलर्स चेक' ची सुविधा आपण उपयोगात आणली पाहिजे. ट्रॅव्हलर्स चेक म्हणजे काय? हा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडला असेल.

ट्रॅव्हलर्स चेक म्हणजे जेवढे पैसे आपल्याला बरोबर न्यायचे आहेत तेवढे आपल्या बँकेत जमा करायचे व तेवढ्या रकमेचे ट्रॅव्हलर्स चेक बँकेतून घ्यायचे आणि हे चेक प्रवासाला न्यायचे. एवढी रोख रक्कम सांभाळण्यापेक्षा हे चेक बरोबर नेणं खूपच सोईचं असतं.

ज्या गावी तुम्ही जाणार तिथे तुमच्या बँकेची शाखा असणे मात्र गरजेचे आहे. बँकेच्या त्या शाखेत तुम्ही तुमचा ट्रॅव्हलर चेक जमा केलात की त्या शाखेतील व्यक्तीसमोर तुम्ही एक सही करायची. ट्रॅव्हलर चेकवरील तुमची सही व त्या व्यक्तीसमोर केलेली सही, तो एकमेकांशी पडताळून पाहतो व तुम्हाला त्या चेकप्रमाणे पैसे देतो. आहे की नाही आपली मोठी सोय. प्रवासभर पैसे सांभाळायलाही लागत नाहीत आणि त्या गावी पोहोचल्यावर खर्चाला लगेच बँकेतून पैसे मिळण्याची सोयही होते.

आता या चेकचे फायदे बघूया -

१) अगदी लहान आकाराचे किंवा संख्येने कमी असलेल्या चेकद्वारे मोठ्यात मोठी रक्कम आपण बाळगू शकतो.

२) हे चेक खुद्द त्या व्यक्तीशिवाय इतर कोणीही बँकेत जमा करू शकत नाही. त्यामुळे हे चेक चोरीला जाण्याचा धोका कमी असतो.

३) बँकेतील व्यक्तीसमोरच तुम्हाला सही करावी लागते. त्यामुळे कुणीतरी बळजबरीने तुमची सही घेऊन बँकेतून या चेकच्या आधारे पैसे काढू शकत नाही.


४) समजा हा चेक हरवला तर तुम्हाला पैसे मिळू शकत नाहीत. मात्र बँकेच्या मॅनेजरला तुम्ही ओळखपत्र दाखविलेत व तुमची ओळख पटवून दिलीत तर तुम्हाला पैसे मिळू शकतात.

अगदी तुम्ही मित्र-मित्र मिळून सहलीला जातानाही असे चेक बरोबर नेऊ शकता. फक्त यासाठी तुमचं खातं एखाद्या बँकेत पाहिजे. अगदी सहज प्रयोग म्हणून हे चेक वापरून तर बघा ! त्याचे किती फायदे होतात ते आम्हालाही जरूर कळवा. ❊❊❊

# हे तुम्हाला माहीत आहे का ?

**१) घार पंख न हलविता कशी उडते?**

आकाशात खूप उंचावर घार पंख न हलविताही तरंगताना आपण नेहमी बघतो. हवेमध्ये तरंगणाऱ्या अनेक वस्तू म्हणजे वाळलेली पाने, पिसे, कापसाच्या म्हाताऱ्या, हलक्या बिया आपण पाहिलेल्या असतात. मात्र, एखादा दगड सोडला तर तो मात्र वरून सरळ खाली




येतो. वास्तविक हवेतून जाणाऱ्या सर्वच वस्तूंना हवेचा अडथळा होत असतोच. परंतु वस्तूची घनता बरीच असेल, म्हणजेच आकार लहान व वजन बरेच जास्त असेल तर तिच्या गतीवर हवेच्या अडथळ्याचा परिणाम होत नाही. याउलट पृष्ठभाग मोठा व वजन कमी असेल तर हवेच्या विरोधामुळे त्या वस्तूची गती सहज कमी जास्त होऊ शकते.

काही साध्या प्रयोगांवरून ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल. दोन रबरी फुगे घ्या. त्यातील एक फुगा फुगवा. आता हे दोन्ही फुगे जर उंचावरून सोडले तर न फुगविलेला फुगा पटकन जमिनीवर पडेल; फुगविलेला फुगा मात्र हळूहळू खाली पडेल. तसेच एखाद्या बंद छत्रीपेक्षा एखादी उघडी छत्री सावकाश खाली पडेल. विमानातून उड्या टाकणारे छत्रीधारी सैनिक ह्याचाच उपयोग करतात. त्यांची छत्री अगदी हलक्या कापडापासून बनविलेली असते व तिचा आकारही खूप मोठा असतो.

घारीचे पंख खूप लांब-रुंद असतात (मोठे असतात), तसेच आकाराच्या मानाने घारीचे वजन तसे कमीच असते. तिने पंख उघडले की ते एखाद्या मोठ्या छत्रीसारखे पसरतात. त्यांच्या साहाय्याने ती हवेत सहज तरंगत फिरू शकते. जमिनीवरून उडण्यासाठी आणि उंचावर जाण्यासाठी मात्र तिला पंख हलवावेच लागतात, हे येथे लक्षात ठेवावे. एकदा ती उंच गेली की मात्र पंख न हलविता तशीच तरंगू शकते. हवेत तरंगताना खाली येऊ लागल्यास मात्र पुन्हा पंख हलवून ती वर जाते.

हवेत तरंगण्यासाठी घार हवेच्या प्रवाहांचाही उपयोग करून घेते. कधी कधी जमीन निरनिराळ्या ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात तापल्यामुळे हवेचे वर-खाली जाणारे झोत तयार झालेले असतात. अशावेळी घार वर जाणाऱ्या हवेचे झोत शोधून त्यांच्यावर पंख पसरून तरंगत राहाते. घारीप्रमाणे, हवेच्या झोतावर तरंगत जाण्याचा खेळ खेळण्यासाठी, कधी कधी इंजिन नसलेली लहान विमाने वापरतात. (अशा विमानाला 'ग्लायडर' म्हणतात.)



वैमानिक त्यात बसल्यावर ते विमान जोराने हवेत उडवितात. मग हवेचे वर जाणारे प्रवाह शोधून, वैमानिक त्यांच्या जोराने विमान वर घेऊन जातो व जास्तीत जास्त वेळ घिरट्या मारण्याचा प्रयत्न करतो. खाली येताना विमान अलगद तरंगत खाली आणणे, ह्यात त्याचे खरे कौशल्य असते.

**२) सूर्य दुपारी दिसतो त्यापेक्षा उगवताना किंवा मावळताना मोठा का दिसतो?**

सूर्य पृथ्वीपासून सुमारे १५ कोटी किलोमीटर दूर आहे. तसेच, पृथ्वीची त्रिज्या सुमारे ६००० किलोमिटर आहे. त्यामुळे, दुपारच्या वेळी सूर्य जेव्हा डोक्यावर येतो, तेव्हा सकाळ किंवा संध्याकाळपेक्षा खरे म्हणजे तो सुमारे ६००० किलोमिटरने आपल्या जवळ आलेला असतो. कोणतीही वस्तू जवळ आली की ती मोठी दिसते, हे तुम्हास माहीत आहे. म्हणून दुपारचा सूर्य सकाळच्या सूर्यापेक्षा, दिसलाच तर, थोडासा मोठाच दिसायला हवा ! परंतु तो दिसतो मात्र लहान ! (१५ कोटी किलोमीटरमध्ये ६००० किलोमीटरचा फरक, म्हणजे अगदीच क्षुद्र फरक आहे, ही गोष्ट निराळी !)

हा सर्व दृष्टिभ्रमाचा प्रकार आहे. सकाळी, दुपारी व संध्याकाळी सूर्याचा जर फोटो काढला किंवा एखाद्या भिंगाने त्याची प्रतिमा जर पडद्यावर पाहिली, तर त्यात काहीच फरक पडलेला दिसत नाही. हाच दृष्टिभ्रम चंद्राच्या बाबतीतही घडतो. उगवत्या चंद्राची चकती चांगलीच मोठी भासते.

उगवणाऱ्या सूर्याची किंवा चंद्राची, आपण त्यांच्या-बरोबर दृष्टिपथात येणाऱ्या काही वस्तूंशी नकळत तुलना करतो, म्हणून कदाचित असा भ्रम होत असेल. डोक्यावर आल्यावर मात्र सूर्याची तुलना करायला जवळपास कोणतीच वस्तू नसते. थोडक्यात म्हणजे, हा परिणाम खरा (भौतिक) नसून केवळ कल्पनेचा खेळ आहे !

***


('कुतूहल' या डॉ.र.गो.लागू यांनी संपादित केलेल्या पुस्तकातून साभार)


# कविता पानोपानी

## माझ्या अंगणात

आज माझ्या अंगणात
सडा मृगाने शिंपला
पुन्हा एकदा वसंत
थोडा डोकावून गेला ।।धृ ।।
आज माझ्या अंगणात
घाली श्रावण रांगोळी
पुढे आश्विन कार्तिक
त्यांची येणार दिवाळी.
फुले सुगंधाची कळी
हर्ष मनात दाटला ।।१ ।।
पुढे माझ्या अंगणात
मार्गशीर्षाचे पाऊल
पौष रेखिल स्वस्तिक
सारे मांगल्य येईल
घरी दारी प्रसन्नता
जीव चांदण्यात न्हाला ।।२ ।।
असे माझ्या अंगणात
ऋतू मास येती-जाती
सोनियाची स्वप्ने माझी
रंगागंधात खुलती
जळुनिया गीत ओठी
शब्द शब्द सूर झाला ।।३ ।।

**– बजरंग सरोदे**
''कौस्तुभ'', रणपिसे नगर, अकोला.





## झाड मोठं अजबच असतं !

कड्या-कपारीत, दगडाच्या खबदाडीत
कुठेही उगवतं, छाटलं तरी वाढतं,
वादळ-वाऱ्याशी झगडत
जिद्द जगायची तेच शिकवतं,
झाड मोठं अजबच असतं!

पल्लव पाचूचे लेवून येतं
वैशाख वणव्यात गारवा देतं
रंग-गंधाची उधळण करीत,
उन्हाच्या खाईत वसंत फुलवतं
झाड मोठं अजबच असतं !

झाड देवाचं देणं असतं
जपणं आपलं काम असतं
झाड पक्ष्यांचं गाव बनतं,
दमल्या पांथाचं घर होतं,
झाड मोठं अजबच असतं !

प्रखर उन्ह माथ्यावर झेलतं
धरेवर मात्र छत्र धरतं
भूमीतून जीवन घेत
भूमीलाच संजीवन देतं,
झाड मोठं अजबच असतं.

**– विद्या प्रभू**
हरि ॐ को.ऑ.हौ.सोसा.
फ्लॅट नं. १ शनिनगर, बदलापूर(प.)
जि.ठाणे – ४२१५०३.

# मित्रांची भेट


उमा बापट

आमच्या घराजवळच एक नर्सिंग होम आहे. मी आणि माझे आजोबा दर शनिवारी तिथे जायचो. अनेक म्हातारी माणसे व ज्यांना स्वत:ची स्वत: काळजी घेणे शक्य नसते, असे काही आजारी लोक त्या नर्सिंग होममध्ये राहातात. ''आजारी माणसांना भेटायला जाणे, म्हणजे त्यांचे आयुष्य वाढविणे असते'', असे आजोबा नेहमी म्हणायचे.

नर्सिंग होममध्ये पहिल्यांदा आम्ही एका बाईंना भेटायचो. त्यांना मी 'सुग्रणकाकू' म्हणायचे; कारण रशियामध्ये असताना, त्या कशा चांगल्या स्वयंपाकीण म्हणून प्रसिद्ध होत्या, हे त्या नेहमी आम्हाला सांगायच्या. नंतर आम्ही एका काकांना भेटायला जायचो. त्यांचे नाव मी 'विनोद काका' असेच ठेवले होते. ते सदान्कदा आम्हाला विनोदच सांगायचे. ते स्वत:च्या विनोदांवर स्वत:च हसायचे. त्यामुळे विनोद फार आवडला नसला तरी त्यांचा हसताना चेहरा बघून मला हसू यायचे. त्यानंतर आम्ही एका 'गानसेनला' भेटायचो, म्हणजे ते अखंड गायचे म्हणून त्यांचे नाव मीच गानसेन, असे ठेवले होते. त्यांना आम्हाला गाणे ऐकवायला फार मनापासून आवडायचे. ते इतके उत्साही असायचे की, अनेकदा आम्ही पण त्यांच्याबरोबर गाणी म्हणायचो. अजून एक आजी होत्या, त्या नेहमी त्यांच्या नातवंडांबद्दल बोलत राहायच्या. त्यांच्या खोलीत सगळीकडे नातवंडांचेच फोटो लावलेले असायचे. तिथल्या एक बाई मला फार आवडायच्या, त्यांना मी मावशी म्हणायचे. आम्ही इतरही काही लोकांना भेटायचो. त्यातले काही तर फार शांत असायचे. आम्ही जेवढे बोलू, तेवढेच ऐकायचे, ते मात्र विशेष बोलायचे नाहीत. आम्ही निघालो की सगळे जण 'पुढच्या वेळी नक्की या' असे आग्रहाने सांगायचे. तिथे काम करणारी मुलगी पण आवर्जून सांगायची. आम्हीही दर आठवड्याला अगदी न चुकता जायचो. पाऊस-पाणी काहीही असले तरी सुग्रणकाकू, विनोद काका आणि इतर सर्वच मित्र मंडळींना भेटणे, आम्ही चुकवले नाही.

एकदा आजोबांना बरे नव्हते. त्यांना दवाखान्यात ठेवावे लागले. ते पूर्ण बरे होतील याची डॉक्टरांना खात्री वाटत नव्हती. शनिवार आला, नर्सिंगहोममध्ये जायची वेळ झाली. पण आजोबांना सोडून मी एकटी कशी जाणार? असे मला वाटत होते. ''चांगले काम करण्यात कशामुळेही खंड पडता कामा नये.'' असे आजोबा नेहमी म्हणायचे. त्याची मला एकदम आठवण झाली. त्यामुळे त्यादिवशी मी एकटी गेले. मला पाहून सगळ्यांना अर्थातच आनंद झाला. पण आजोबा कसे आले नाहीत? याचे त्यांना आश्चर्यदेखील वाटले. आजोबांना बरे नसल्याचे जेव्हा मी सांगितले तेव्हा सर्वांनी माझी समजूत काढली. मला बरे वाटावे म्हणून विनोदकाकांनी नेहमी पेक्षा जास्त विनोद सांगून मला हसविण्याचा प्रयत्न केला. गानसेनने खास माझ्यासाठी नवीन गाणे म्हटले. इतर सगळ्यांशी मी खूप गप्पा मारल्या. आजोबा बरे होतील असे सर्वांनी मला सांगितले.

काही दिवस आजोबा दवाखान्यातच होते. ते काही खात



नव्हते. त्यांनी नीट उठूनही बसता येत नव्हते. ते जास्त बोलू शकत नव्हते. त्यादिवशी तर मला त्यांची अवस्था बघून रडायलाच येत होते. माझे रडणे त्यांना कळू नये, म्हणून मी त्यांच्या खोलीच्या एका कोपऱ्यात थांबले होते. माझ्याऐवजी आई त्यांच्या जवळ बसली होती. इतक्यात नर्सने सांगितले की 'तुम्हाला कोणी तरी भेटायला आले आहे' मी वळून पाहिले तर विनोदकाका, सुग्रणकाकू, गानसेन आणि आमची इतर सर्व मित्र-मंडळी, अगदी तिथे काम करणारी मुलगीसुद्धा आजोबांना भेटायला आली होती. त्या सगळ्यांनी आजोबांशी खूप गप्पा मारल्या. सुग्रणकाकूंनी तर आजोबांसाठी खाऊपण आणला होता. त्यावरही विनोदकाकांनी खूप विनोद केले. सगळे जण खूप हसले. आजींनी त्यांच्या नातवंडांनी काढलेली चित्रे दाखवायला आणली होती. गानसेनने तेवढ्यातही एक छोटे, आजोबांच्या आवडीचे गाणे म्हटले. आजोबा भर पावसात, मावशीच्या वाढदिवसाला गुलाबाची फुले घेऊन कसे गेले होते, त्याची आठवण तिने सांगितली. तेवढ्यात 'भेटण्याची वेळ संपत आली आहे.' अशी सूचना नर्सने केली. वेळ कसा गेला कोणालाच कळले नव्हते. आजोबा बरे व्हावे, म्हणून सगळ्यांनी मिळून एक छोटी प्रार्थना म्हटली व त्यांनी आमचा निरोप घेतला.

त्या संध्याकाळी आजोबांनी नर्सला आपणहून बोलावले. त्यांना भूक लागली होती ! थोडेच दिवसात ते उठू शकले, गादीतून बाहेर येऊ शकले. दिवसेंदिवस त्यांची प्रकृती सुधारत होती. डॉक्टरांनी त्यांना घरी पाठविण्याचा निर्णय घेतला. आजोबांचे बरे होणे हा डॉक्टरांसाठी एक चमत्कार होता. मला त्याचे कारण माहीत होते. त्यांच्या मित्रांच्या भेटीनेच ते बरे झाले होते. आजोबांची तब्बेत आता खूपच चांगली आहे. दर शनिवारी न चुकता आम्ही आमच्या मित्रांना भेटायला जातो. सुग्रणकाकू, विनोदकाका, गानसेन, आजी, मावशी आणि सगळेच आमची वाट बघत असतात...

***

**मूळ कथा – डेबी हरमन**
**मराठी रूपांतर – उमा बापट**
९८ एस. पॅटर्सन अव्हेन्यू,
सांता बार्बरा, कॅलिफोर्निया, यू.एस.ए.

## हसा हसा



### कात्री

* शेजारच्या घरी जाऊन छब्या म्हणाला, ''चिंगूमावशी, तुमची कात्री देता का हो जरा? तासाभरात मी ती परत करतो,'' चिंगूमावशींनी विचारलं, ''छब्या, माझी कात्री कशाला हवीये? तुमच्याकडे कात्री नाही का?'' छब्यानं उत्तर दिलं, आमच्याकडे कात्री आहे हो, पण आई मला म्हणाली, ''आपल्या घरातली कात्री मी तुला पत्रा कापण्यासाठी देणार नाही. वाटल्यास शेजारच्या चिंगूमावशींची कात्री तू मागून आण किती कापायचे असतील तितके पत्रे काप.''

### ग्रंथलेखन


* सतत ग्रंथलेखनात गढून गेलेल्या एका विद्वानाला त्याच्या घरी येणाऱ्या मोलकरणीनं विचारलं, ''सायब, बघावं तवा तुम्ही काहीतरी लिवत असता. काय लिवता हो एवढे?''

**साहेब –** अगं मथुरा, मी पुस्तक लिहितोय.

**मथुरा –** अगो बया ! पुस्तकासाठी एवढी मेहनत? दाईस-रुपयांना बाजारात पुस्तक इकत मिळत असताना आणि तेवढे पैसे खर्च करण्याची तुमची ऐपत असताना, हा लिवण्याचा तरास कशापायी घेता?



# कोकणी जत्रेची रात्र



अगदी शपथेवर सांगायचं तर पन्नास-साठ वर्षांपूर्वीचं कोकणी खेड्यातलं जीवन, साफ-साफ अळणी होतं. अचूक सांगायचं, तर कोकणी खेडं हे पृथ्वीतळावर असूनही जगापासून तुटलेलं, अलग असं निश्चल डबकं होतं. त्या डबक्यात साचलेल्या पाण्यावर तरंग म्हणून कसे ते उठतच नसत. स्वातंत्र्यपूर्व काळात कोकणात काहीही घडत नसे. त्या काळातली गावातली सर्वात मोठी घटना म्हणजे चंद्राला खळं पडणं आणि मग आता राजा मरणार म्हणून आम्ही पोराटोरांनी कावरंबावरं होणं ! त्यापलीकडं काहीही नाही. भातशेती वगळता कोकणात इतर उद्योगधंदेच नव्हते. वस्तुविनिमयावरच गावकऱ्यांचं भागे. ही बांबूची काठी घे नि बदल्यात दहा चिमट्या साखर दे, असे लोकव्यवहार सर्रास होत. पावसाळा तोंडावर आला की ह्या व्यवहारांना ऊत येई. सुक्या मासळीची पुडकी घेऊन, मुसलमान होडीवाले बंदरात कुकारे घालीत. ते कानी पडताच, गावकरी सुक्या लाकडांचे भारे डोईवर घेऊन बंदराच्या दिशेने धूम ठोकीत. तिथे वस्तूंची अदलाबदल होई. लाकडं होडीवाल्यांना मिळत. गावकऱ्यांच्या पदरात सुके बोंबील नि सुकट पडे. पावसाळ्याची बेगमी झाली म्हणून दोघेही खूष असत.

कोकणी गावात आखीव सडका कधीही नव्हत्या, आजही नाहीत. जिकडे तिकडे पायवाटा आणि उभ्या घाट्यांचं राज्य. बहुतेक घाट्या पेशव्यांच्या काळातल्या होत्या. खाड्यांचं जाळं होतं. बांबूचे साकव होते. साधी काडेपेटी विकत घ्यायची असली तरी किमान दोन साकव ओलांडावे लागत. कोकणी गावगाड्यात बाजारपेठ नावाची चीज कधीही नव्हती. आठवड्याचे बाजार नव्हते. कोकणी गावं इथून तिथून रिकामी, निर्धन आणि सुनीसुनी असत. धडधाकट कोकणी बाप्ये शेतात हयात घालवीत. एखाद-दुसराच त्या आळणी आयुष्याच्या शापातून सुटून मुंबईची गिरणी गाठी. कोकणी राहाळात मागे उरलेले म्हातारे-कोतारे, मुंबईकर चाकरमान्यांच्या मनीऑर्डरींची डोळ्यात प्राण आणून वाट पाहात. मनीऑर्डरी कधीही घसघशीत नसत. किरकोळ असत. पाच रुपयांपासून दहा रुपयांपर्यंत. येता-जाता गावकरी एकमेकांना एकच प्रश्न विचारीत, 'रे, तुका पोष्टमन दिसलो मा? मेलो खय तो?'

आडातून पाणी काढणं आणि उभ्या घाट्या दमात चढून ते घरापर्यंत वाहून नेणं, हा कोकणी आया-बायांचा दिवसभराचा उद्योग असे. गरज असो, नसो रिकाम्या कळशा घेऊन त्या पाणवठ्यावर जमत आणि गावकरणींबरोबर सांसारिक गप्पा करत. गप्पा सगळ्या वायफळ असत. जे फारच म्हातारे होते, ज्यांची गात्रं पूर्णपणे थकलेली होती, ते शेतावर झाडाखाली बसून, गुरं राखण्याचं बैठं काम करीत. असं एकसुरी जगणं सालोसाल चाले. तेच गरुड पक्षी, तेच होडीवाल्यांचे कुकारे, तिन्हीसांजेची तीच शेताडातली कोल्हेकुई आणि तेच ते अधून मधून कानावर पडणारे देवळातल्या घंटांचे एकाकी टोले. बाकी कोकणी जग गुहेसारखं शांत शांत असे. सूर्य उगवे, सूर्य मावळे, चंद्र उगवे, चंद्र मावळे; संपलं.

खुद्द माझं गाव खाडीच्या तीरावर वसलेलं आहे. बंदरात ढोपरभर चिखल. मग भाताची चतकोर खाचरं. त्यानंतर राईचा पट्टा आणि झाडा-माडांत विसावलेली शेतकऱ्यांची जातवार वस्ती, असा गावाचा उंचसखल घाट आहे. त्यात शंभर वर्षं मांडी ठोकून बसलेली एक प्राथमिक शाळा, शाळेपेक्षाही जुनं असलेलं

महालक्ष्मीचं स्वच्छ सारवलेलं एकोशी देऊळ आणि थोड्या अंतरावर वसलेला बुद्धवाडा, इतक्याच वस्तीच्या खुणा. पन्नास-साठ वर्षांपूर्वी गावात आंब्याच्या बागा औषधापुरत्याही नव्हत्या. क्वचित कुठे एखाद-दुसरं हौसेनं लावलेलं कलम असे. बाकी सर्वत्र रायवळ आंब्याची जुनी झाडं होती. नारळी, फणस, बांबू, रातांबे आणि पळस-पांगारे, हीच वनश्री. होड्यांची खाडीतली वाहतूक अहोरात्र सुरू असे. कौलं, सुंभ, कवळकाठी, विटा, मीठ, रहाटांचं सामान आणि सुकी मासळी या वाहतुकीच्या प्रमुख वस्तू. वाहतुकीची वंशपरंपरागत वहिवाट मुसलमानांकडे असे. त्यांनी होड्या वल्हवायच्या, ताशे वाजवायचे नि मासे पागायचे. ह्यापलीकडे चौथी विद्या त्यांच्या वंशाला ठाऊक नव्हती. खाडीकाठावरल्या प्रत्येक बंदरात, मुसलमानांच्या चार-पाच कंगाल घरांची वाडी असे. छातीचे खोके झालेले व जाळी विणत बसलेले कफल्लक म्हातारे, चुली फुंकीत बसलेल्या लेकुरवाळ्या बायका (आणि त्यांच्या चार-पाच कोंबड्या) हेच कोकणी मुसलमानांचं त्रिभुवन होतं. सरसकट सगळे मराठी बोलत. मराठी पेहेराव करीत.

हो आणि हजार-पाचशे वस्तींचा एवढा गाव, पण गावाच्या हद्दीत कधी वर्तमानपत्राचा कपटासुद्धा येऊ धजला नाही. गाव अडाणी होता. निरक्षर होता. आला दिवस धकलून नेत होता. गावकऱ्यांना कशाचंच सोयरसुतक नव्हतं. मुंबईत दंगा सुरू झाला की मात्र ताजी बातमी ऐकायला आख्खा गाव उतावीळ होई. गावात ताजी बातमी होडीवाले आणीत. त्यांच्या वाटेकडे गावकऱ्यांचे डोळे असत. दंगा संपला, शांत झाला की पुन्हा गाव मूळपदावर येई. निपचित पडे.

अशा आमच्या पेंगुळलेल्या वाडीला उत्तेजित करणारा एकमेव दिवस म्हणजे, वर्षातून एकदा भरणारी ग्रामदेवतेची जत्रा. काळुबाई म्हणजे काळ्या शिळेतून घडवलेली अष्टभुजा देवीची शस्त्रसज्ज मूर्ती, ही आमच्या गावाची रखवालदारीण. गावात राहाणाऱ्या आणि गावाबाहेर पांगलेल्या, झाडून साऱ्या ग्रामस्थांच्या नमस्कारांचा मूक स्वीकार, काळुबाई युगे युगे करीत आलेली आहे. तेलाचं माखण घालून तिला चकचकीत करायचं, फुलांची आरास करायची, तिच्या पायाशी नारळ वाढवून प्रसादाचं खोबरं खायचं नि कपाळाला मऊमऊ अंगारा लावायचा, हे जत्रेच्या दिवसाचं गावकऱ्यांचं कर्मकांड. गोव्यात, वाडीकडे आणि इतर मोठ्या कोकणी गावात चालतो, तो जत्रेच्या रात्री ग्रामस्थांनी नाटक घालणं, वगैरे प्रकार विजयदुर्गाच्या पंचक्रोशीत नाही. आमच्याकडे दशावतारही नाहीत. पाळणे, तंबूतले फिरते सिनेमे, वगैरे नाहीत. गर्दी नाही. गदारोळ नाही. देवीच्या गाभाऱ्यात फक्त गुरवाचं राज्य. तो गाऱ्हाणी घालणार आणि घुमणार.

देवळाच्या आवारात, तात्पुरती पालं ठोकून उभी केलेली इन मीन तीन दुकानं. एका पालात गरमागरम कांदाभज्याचं तळण नि काळा चहा. दुसऱ्या पालात साखरेच्या चित्रांच्या रंगीत माळा, गुळात तळलेले, पीठाचे खाजे आणि चणे-फुटाणे. तिसऱ्यात कुरकुरीत जाडी शेव, पोह्यांचा तिखट चिवडा आणि शेंगदाण्याचे काळपट लाडू ह्यापलीकडे काहीही नाही. विक्रीचे सर्व व्यवहार आण्यांमध्ये ! घरात साठवणीला म्हणून जपून-जपून ठेवलेला पै-पैसा, बायामाणसं जत्रेला आणीत. एक पैसा देवतेच्या पायावर. एक पैसा मूर्तीसमोर मांडून ठेवलेल्या भटजींच्या पाटावर आणि उरलेले आणे-दोन आणे, गरमा गरम कांदाभज्यांवर आणि शेंगदाण्याच्या लाडवांवर. ही साठ-सत्तर वर्षांपूर्वीच्या कोकणी चैनबाजीची हद्द ! जत्रेच्या दिवशी दिवेलागणीपासूनच मी देवळाच्या आवारात रेंगाळत असे. खिशात पैसा असणं शक्यच नव्हतं. घरी पोटभर आमटी-भात मिळत असताना खिशात आणे कशासाठी बाळगायचे? आणि द्रव्य आणायचं कुठून? ब्राह्मणांच्या घरात भाताची बेगमी भक्कम. गोठ्यात गुरं-वासरं; त्यामुळे दारात आलेल्याला कपभर ताक मिळणारच, अशी नामी सुबत्ता. मात्र, आम्हा ब्राह्मणांच्या पोराबाळांचे खिसे आजन्म रिकामे. ग्रामदेवतेच्या जत्रेच्या रात्री, मी कांदाभज्यांच्या उत्तेजक वासावर तरंगत असे. ह्या क्षणीही मला तळणाचा तो आठवणीतला खमंग वास चाळवीत आहे !

***

**रवींद्र पिंगे**
७७, जय हनुमान सोसायटी (६)
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.

# मराठीचा बोलु

- मीनाक्षी कठाळे

*'माझा मराठीचा बोलु कौतुके, अमृतातेही पैजा जिंके'* असं ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटलेलं तुम्हाला माहीत आहे. मराठीचा बोलु-शब्द एवढा अर्थपूर्ण, गोड असतो की अमृत त्या गोडीपुढे फिके पडते, असा त्याचा सरळ अर्थ आहे. जसजसा शब्दांचा अर्थ कळू लागतो, तसतशी भाषेची गोडी अधिक वाटू लागते. अमृताप्रमाणेच भाषा अधिकाधिक मधुर भासू लागते. फॅशनप्रमाणे भाषादेखील नित्य बदलत असते. पूर्वी, बारा कोसांवर भाषा बदलते असे म्हणत. पण इतक्या वर्षांनंतर आजही ती बदलताना आणि तिला नवे अर्थ प्राप्त होताना आपल्याला दिसतात.

भाषा कशी निर्माण झाली आणि अमूक नाव कोणी दिले, कसे दिले, हा प्रश्न आजही सुटलेला नाही. भाषा ईश्वराने निर्माण केली, असा पूर्वी समज होता. पण आजच्या विज्ञानयुगात ते पटत नाही.

भाषा ही ध्वनीशी निगडित आहे; ज्यातून अर्थ प्रतीत होतो. उदाहरणार्थ फटाका म्हणताच 'फट्' असा आवाज होणारी वस्तू डोळ्यापुढे येते. धबधबा म्हटले की, 'धबधब' आवाज आपल्या चटकन लक्षात येतो (धबधबा पाहिला नसला तरी). लहान मुले बोलायला कशी शिकतात, हे तुम्ही जरा लक्ष देऊन पाहा. रोज प्रेमाने जवळ घेणारी, खाऊ घालणारी, दूध देणारी ती आई; हे त्याला इतरांच्या बोलण्यावरून व स्वत:च्या अनुभवावरून कळते. चिवचिव करत उड्या मारणारा चिमुकला पक्षी म्हणजे चिमणी हे त्याला कळते.

आपले बोलणे चटकदार व्हावे, त्यातून योग्य अर्थ प्रगट व्हावा, म्हणून आपण वेगवेगळ्या पद्धतीने बोलतो, उच्चारात फरक करतो. उदा. वर्गात शिक्षिकेने 'वा ! छान उत्तर दिलं. हुशार आहात हं तुम्ही मुलं !' हे आणि 'फार हुशार आहात! बसा आता खाली' ह्या दोन वाक्यातील हुशार शब्दाचा अर्थ वेगवेगळा आहे, हे तुम्हाला अनुभवाने माहिती आहे.

शब्दाच्या अर्थाचा विस्तार होऊनही अर्थ बदलतात. 'मृग' म्हणजे हरीण आणि हरणाची शिकार ती 'मृगया'. पण आपण कुठल्याही प्राण्याच्या शिकारीला मृगयाच म्हणतो. 'राजा मृगयेसाठी नगराबाहेर पडला,' असे गोष्टीत असते, नाही का? 'गंगा' म्हणजे उत्तर भारतातील पवित्र अशी नदी. पण नाशिकच्या गोदावरीलाही गंगा म्हणतात. फार काय कुठल्याही खेड्यातल्या लहानशा नदीला त्या गावचे लोक 'गंगा'च म्हणतात. 'यजमान' म्हणजे यज्ञ करणारा. घराचा स्वामी, स्त्रीचा पती, पाहुण्यांचे स्वागत करणारा प्रमुख, असे अनेक अर्थ त्याला प्राप्त झाले. प्रवीण म्हणजे चांगली वीणा वाजवणारा. पण त्याचा अर्थविस्तार होऊन कोणत्याही कामात तरबेज असणाऱ्याला, आपण प्रवीण म्हणतो. कुसळ हाताला न टोचता 'कुश' नावाचे गवत तोडणारा तो 'कुशल' असा अर्थ असलेला कुशल शब्दपण आपण प्रवीणसारखाच सर्वत्र वापरतो. कारखान्यात मोठमोठ्या यंत्रांना हाताळणाराच नाही तर खिसे कापणाराही कुशल/प्रवीण झाला. 'निपुण' ही तसाच. पुण्य करणारा तो निपुण. त्याचाही अर्थविस्तार कुशल, प्रवीण प्रमाणेच झाला. तीळापासून निघणारे ते 'तेल' पण शेंगदाणे, करडई, जवस, खोबरे, एरंडी यापासून निघणाऱ्या तेलकट द्रवाचे नाव तेलच. मीठभाकर, चोळीबांगडी ह्यांचाही असाच अर्थविस्तार झाला आहे.

कधी कधी अर्थसंकोचदेखील होतो. जसे 'हिमालय'. ज्या ज्या पर्वतावर बर्फ असते, त्यांना हिमालय म्हणायला हरकत नाही. पण भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वतालाच फक्त आपण हिमालय म्हणतो. पंकात जे जे जन्मते ते ते पंकज. पण अर्थसंकोच होऊन 'कमळ' हाच अर्थ रूढ झाला. 'जनावर' म्हणजे सर्व प्राणी असे असताना ग्रामीण भागात मात्र 'साप' या अर्थानेच तो शब्द वापरल्याचे पाहातो, ऐकतो. खेड्यातील माणसे 'शेतात लई मोठ्ठं जनावर दिसलं जी' असं म्हणताना तुम्ही ऐकलंही असेल तसंच श्रद्धेने केलेले कुठलेली कार्य म्हणजे श्राद्ध. पण पितरांना जेवण देणे, पाणी देणे, या संकुचित अर्थानेच श्राद्ध शब्द रूढ आहे.

आपण वाईट अर्थ चांगल्या शब्दात गुंडाळून बोलतो तर कधी कधी वाईटही बोलतो. थोर पुरुष वारला असता तो मरत नाही तर कैलासवासी, ख्रिस्तवासी, पैगंबरवासी होतो. त्याला देवाज्ञा होते. पूर्वी प्रातर्विधी घराच्या मागील अंगणाच्या-परसाच्या एका कडेला

करत. म्हणून ‘परसाकडे जाणे’ रूढ झाले. आता अंगणही नाही. परसही नाही, तरी ब्लॉकमधल्या संडासात जाण्याला, परसाकडे जाणेच म्हणतात.

वरीलप्रमाणे कधी कधी आपण असभ्यपणा टाळतो तर कधी उघड उघड शब्दप्रयोगही करतो. नाणे जसे वापरून गुळगुळीत होते. तसा शब्दाचा अर्थही वापरून गुळगुळीत होतो. त्यातील असभ्यपणा कमी होतो.

पूर्वी चांगल्या अर्थाने रूढ असलेले शब्द, त्यांच्या अर्थाचा विपर्यास होऊन रूढ झालेले दिसतात. जसे ‘दारू’, प्राचीन काळी ते एक औषध होते. आज वाईट उत्तेजक पेय म्हणून कुप्रसिद्ध आहे. ‘सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, कर कटावरी ठेऊनिया’ या अभंगात ‘ध्यान’ हा शब्द अतिशय सुंदर आणि समर्पक अर्थाने वापरला आहे. ‘काय ध्यान दिसते पाहा’ ह्या वाक्यात आपण त्याचा अगदी उलट अर्थ रूढ केला. गीतेत अर्जुनाला भगवंतांनी कितीतरी वेळा ‘भट’ ‘सुभट’ म्हटले आहे. त्याचा अर्थ चांगला योध्दा. आज समस्त ब्राह्मणवर्गाला किंवा खादाड लोक या अर्थाने ‘भट’ शब्द रूढ आहे. महाराज हाही शब्द ह्यातलाच. ‘शिक्षा’ म्हणजे शिकवण असे असूनही, सजा करणे त्याचा असा अर्थ प्रचलित आहे. ‘हरिजन’ चांगल्या अर्थाचा असूनही आपण त्याचा अर्थ संकुचित केला. ‘आकाशवाणी’ रेडिओला म्हटले, तर सिस्टर (Sister) म्हणजे बहीण असा अर्थ असूनही दवाखान्यातील नर्स, कॉन्व्हेंटमधील शिक्षिका या सर्व Sister झाल्या.

राजकीय घडामोडींमुळे अनेक शब्दांना नवे अर्थ प्राप्त झाले तर काहींचे नवीन अर्थ रूढ झाले सींडीकेट, इंडीकेट, घेराव, बंद, धरणे वगैरे. फार काय ते इंग्रजीतही Gherao, Bhandha, Dharana असेच प्रचारात आहेत.




राजकीय शब्दांप्रमाणेच पौराणिक व ऐतिहासिक शब्द पाहाणेदेखील गंमतीचे आहे. दोन पक्षात (Party) सुंदोपसुंदी झाली असे म्हणतो. पूर्वी सुंद व उपसुंद यांच्यात तिलोत्तमेसाठी द्वंद्वयुद्ध झाले. आज दोन व्यक्तितील भांडणालाही तेच म्हणतो. लक्ष्मणरेषा, रामराज्य, कुंभकर्ण, वामनमूर्ती, बकासूर, भगीरथ प्रयत्न, मायानगरी, वस्त्रहरण हे सर्व शब्द, आपल्या पार्श्वभूमीसह जुना अर्थ राखून आहेत. खूप पाऊस पडला की ‘वरुणाचे तांडव’ होते. त्यात शंकराच्या तांडवनृत्याची आठवण असते. आज बाबांनी नृसिंह अवतार धारण केला यात ‘रागीट नृसिंह’ अपेक्षित असतो. धृव, एकलव्य, कर्ण असे अनेक शब्द आहेत. ऐतिहासिक शब्दात ‘ढालगज’ शब्द मोठा मनोरंजक आहे. मराठेशाहीत सैन्याच्या पुढे चालणाऱ्या, गंडस्थळावर ढाल बांधलेल्या भवानी गजराजाला हे नाव होते. आता उगीचच पुढे पुढे करणाऱ्या स्त्रीला ‘ढालगज भवानी’ म्हणतात. सिकंदर जग जिंकायला निघाला. त्याने जग जिंकले. त्याच्या नावावरून चांगले नशीब या अर्थाने सिकंदर, शिकंदर सध्या रूढ आहे. अटकेवर झेंडे लावणे, पानीपत होणे, भाऊगर्दी, भाऊबंदकी, गनिमी कावा, बारभाईचे कारस्थान, गड आला पण सिंह गेला. हे सर्व शब्द इतिहासाची आठवण देतात. बाजीराव मस्तानी, आनंदीबाई, मातु:श्री, राजे, रामशास्त्री, साडेतीन शहाणे, घाशीराम, सवाई माधवराव, रमा–माधव इ. व्यक्तींची नुसती नावे आपल्याला अनेक गुण–दुर्गण सांगतात.

आपण जसजसे शब्दांकडे पाहू तसतसे अधिकाधिक अर्थ आपल्याला कळतात. जसे वापरू तसा त्यांचा अर्थ बदलतो, ‘रूढ होतो’ हे आपल्या लक्षात येते. शब्दांमागे अर्थ धावतो हेच खरे !

***

**– सौ. मीनाक्षी कठाळे**
१६, बकुल, फ्रेंडशीप सोसायटी
विष्णुनगर, डोंबिवली (प.) ४२१२०२

# स्वधर्मे निधनं श्रेयः।



'सारे काफिरोंको जहन्नुममें पहुँचाएँगे तभी गाजी कहलाएंगे।' अशी प्रतिज्ञा करून मुहम्मद ऊर्फ शहाबुद्दीन घोरी भारतावर चालून आला तेव्हा राठोड आणि चौहान घराण्यातील कलहाग्नी ऐन भरात होता.

जयचंद राठोड आणि पृथ्वीराज चौहान हे खरे तर सख्खे मावसभाऊ. दिल्लीचा राजा अनंगपाळाचे नातू. अनंगपाळाच्या दोन मुलींपैकी कर्पूरदेवीचा मुलगा म्हणजे पृथ्वीराज तर दुसऱ्या मुलीचा मुलगा म्हणजे जयचंद ! दोघांमधील वैरामुळे शहाबुद्दीन घोरी या परकीय शत्रूचाच फायदा झाला. धर्मराज युधिष्ठिराच्या काळापासून हिंदूंच्या साम्राज्याची राजधानी असलेले इंद्रप्रस्थ ऊर्फ दिल्लीचे सत्ताकेंद्र मुसलमानांच्या हाती गेले ते रजपूतांना परत मिळविता आलेच नाही !

तरुण वयात आलेल्या पृथ्वीराजाच्या पराक्रमाच्या गाथा सर्वदूर पसरत होत्या आणि त्याचबरोबर जयचंदाचा द्वेषाग्नी भडकत होता.

परमार राजाची सौंदर्यवती कन्या इच्छनीकुमारीचे पृथ्वीराजाने मोठ्या पराक्रमाने पाणिग्रहण केले, या घटनेनेही जयचंदाचे काळीज मत्सराने जळू लागले.

त्याचे असे झाले; गुजरातचा राजा भीमदेवाला, इच्छनीकुमारी बरोबर विवाह करण्याची इच्छा होती. त्याने आपल्या दूताबरोबर तिच्या वडिलांना म्हणजे परमार राजाला निरोप धाडला.

'इच्छनीकुमारी आम्हास द्यावी. अन्यथा युद्धास सज्ज व्हावे !'

अस्सल रजपूत राजास हा उद्धटपणा कसा सहन व्हावा? परमार राजानेही उलट निरोप धाडला –

'इच्छनीकुमारी तर मिळणारच नाही. हिंमत असेल तर दोन हात करावे !'

भीमदेवाला धडा शिकविण्यासाठी परमार राजाने सैन्याची जमवाजमव सुरू केली. एवढेच नाही, तर त्याने पृथ्वीराजाला आपल्याला मदत करण्यास बोलावले.

पृथ्वीराजही मोठ्या आनंदाने यासाठी तयार झाला. मोठ्या सैन्यानिशी तो भीमदेवावर चालून गेला. आपल्या युद्धकौशल्याने पृथ्वीराजाने भीमदेवाच्या सैन्याची पार धूळधाण उडवली ! भीमदेव पराभूत झाला. संतुष्ट होऊन परमार राजाने इच्छनीकुमारीचा हात पृथ्वीराजाच्या हाती दिला.

इच्छनीकुमारीचे पाणिग्रहण करून पृथ्वीराज विजयोन्मादाने परतला. पाठोपाठ त्याने आसपासच्या राजांशी अनेक लढाया करून आपला दरारा वाढवला.

या सगळ्या बातम्या ऐकून जयचंदाचे मन मत्सराने आणि द्वेषाने तळमळत होते. अशातच आणखी एका बातमीने जयचंदाच्या जखमेवर मीठ चोळले !

अनेक युद्धे जिंकणाऱ्या आपल्या या नातवाला दिल्लीचे राज्य सोपवून, राजा अनंगपाळाने वानप्रस्थाश्रमात प्रवेश केला आणि आपल्या दुसऱ्या नातवाच्या – जयचंदाच्या तोंडाला पाने पुसली ! अजमेरचे राज्य तर पृथ्वीराजाचे होतेच शिवाय त्याला दिल्लीचे राज्य आजोबांकडून मिळावे, याचे जयचंदला मोठेच वैषम्य वाटले आणि या घटनेपासून तर पृथ्वीराज आणि जयचंद यांच्यामधील तेढ वाढीस लागली.

पृथ्वीराजावर कडी करण्यासाठी जयचंदाने राजसूय यज्ञ करण्याचा घाट घातला. परन्तु पृथ्वीराजाने यज्ञास हरकत घेतली. परिणामी, दोघांमधील तेढ आणखीनच वाढली.

अशातच, जयचंदाने संयोगितेचे स्वयंवर मांडले. खरेतर, पृथ्वीराजाच्या पराक्रमाच्या कीर्तीमुळेच संयोगितेचे पृथ्वीराजावर मन जडले होते. तिने पृथ्वीराजाला मनोमन वरले होते. हे लक्षात येताच, जयचंदाने संयोगितेला एकान्तवासात ठेवले आणि आता तिचे स्वयंवर करण्याचे ठरविले.

स्वयंवरासाठी आसपासच्या तसेच दूरदेशींच्या राजांना निमंत्रण होते. पृथ्वीराजाला मात्र हेतूत: त्यातून वगळले होते. उलट, पृथ्वीराजाला

अपमानित करावे या हेतूने जयचंदाने पृथ्वीराजाचा पुतळा बनवून, तो देवडीवर द्वाररक्षकाप्रमाणे उभा केला होता. इतकेच नाही तर या पुतळ्यास खेटरांचा हार घालून, पृथ्वीराजाविषयी आपल्याला वाटणाऱ्या दु:स्वासाचे प्रदर्शनच केले !

पण, या स्वयंवरास वेश पालटून पृथ्वीराज हजर राहिलाच आणि वेळ येताच संयोगितेस उचलून तो निघूनही गेला. संयोगितेचे हरण झाल्यामुळे जयचंद मात्र सूडाने धुमसत होता.

आपापसातील वैरामुळे, देशाच्या दाराशी ठाकलेल्या संकटाकडे मात्र या शूर रजपूत वीरांचे दुर्लक्ष झाले होते. जेमतेम दीडशे पावणे दोनशे वर्षांपूर्वी गझनीच्या महमूदाने पंचवीस वर्षात सतरा स्वाऱ्या करून, देशातील संपत्तीची अमाप लूट केली होती. पवित्र सोमेश्वराच्या मंदिराची विटंबना केली होती. आता गजनी येथील घोर वंशाचा हा दुसरा महमूद उर्फ शहाबुद्दीन घोरी हिंदुस्थानवर चाल करून आला होता आणि वीर रजपूत राजे आपापसात लढत होते...

पृथ्वीराजावर सूड उगवण्यासाठी जयचंदाने शहाबुद्दीनाकडे दूत पाठवून त्याला मदतीसाठी आमंत्रित केले. परक्या शत्रूला दारात घेतले!... पुरुराजा विरुद्ध तक्षशीलेच्या अंभीनेही अलेक्झांडरशी हातमिळवणी केली होती ! आठवले?

उभय सैन्याची गाठ तरायणच्या मैदानावर आमने-सामने पडली ! रजपूतांच्या आणि घोरीच्या सैन्याची मोठी निकराची लढाई झाली. घोरीच्या सैन्याचा धीर सुटला आणि सैनिक इतस्तत: पळत सुटले. खुद्द शहाबुद्दीन घोरी पृथ्वीराजाच्या हाती सापडला.

घोरीला रजपूतांचे युद्धकौशल्य कळून आले. त्यांच्या क्षात्रतेजाने घोरीचे डोळे दिपले. अपमानित होऊन तो एखाद्या उंदरासारखा पृथ्वीराजाच्या पोलादी पंज्यात सापडला. त्याचे प्राणच जायचे परन्तु पृथ्वीराजापुढे गुडघे टेकवून घोरीनं दयेची याचना केली.

'ओ रहमदिल पृथ्वीराज, खुदाके नामपर मेरी जान बक्षो। रहम करो। खुदा कसम, हिंदुस्तानकी तरफ मैं फिर कभी आँख उठाकर न देखूँ।'

सरसावलेली तरवार म्यान झाली! 'शहाबुद्दीन, बडे नसीबवान हो। इसलिये एक राजपूत के हाथ लगे। जाओ तुम्हे जिंदगी की भीख दे दी। सच्चा राजपूत कभी शरण आए शत्रूपर शस्त्र नहीं उठाता। जाओ और फिर कभी हिंदुस्तानके खिलाफ आँख भी ना उठाना।' शरणागतावर शस्त्र उचलू नये या आपल्या राजपूत बाण्याला पृथ्वीराज जागला म्हणून घोरी बचावला. पण घोरीनं आपलं वचन पाळलं का?

पराभवाचा आणि अपमानाचा सल घोरी कधी विसरला नाही. पुढच्याच वर्षी तो अधिक तयारीनिशी, अधिक मोठ्या सैन्यानिशी पृथ्वीराजावर चाल करून आला. जयचंदाच्या आणि पृथ्वीराजाच्या आपापसातील वैराचा त्याने त्यासाठी पुरेपूर उपयोग करून घेतला. जयचंदाने घोरीला पृथ्वीराजाची, त्याच्या सैन्याची खडान् खडा माहिती पुरवली.

दिलेले वचन अवघ्या वर्षभरात मोडून पुनश्च हिंदुस्थानवर स्वारी करणाऱ्या कृतघ्न घोरीविरुद्ध खवळलेले राजपूत वीर एकत्र आले. समरसिंह रावळ, हमीर हाडा यासारखे दीडशे राजपूत राजे पृथ्वीराजाला साथ देण्यासाठी सज्ज झाले. पृथ्वीराजासमोर पवित्र गंगेचे उदक हाती घेऊन त्यांनी शपथ घेतली –

'शत्रूस मारू, अन्यथा स्वधर्म रक्षणार्थ, स्वदेशाच्या रक्षणार्थ प्राणार्पण करू !'

स्थानेश्वरजवळ उभय सैन्यांचा तळ पडला. हिंदूंचे सैन्यबळ इतके प्रचंड आहे हे पाहून घोरी मनोमन हबकून गेला. एवढ्या मोठ्या सैन्यावर एकदम चाल करून जाण्याची त्याची हिंमत होईना.

अशातच लढाईस तोंड लागले आणि लढाईच्या प्रारंभीच पुन्हा एकदा मुहम्मद घोरीला रणांगणातून पळून जावे लागले !

सेनापती चामुंडराय, वीर हमीर हाडा यासारखे शूर राजपूत घोरीचा आणि त्याच्या पळपुट्या सैन्याचा पाठलाग करीत निघाले तेव्हा तर घोरीला पळता भुई थोडी झाली ! पाठलाग करणाऱ्या रजपूत वीरांची चांगलीच करमणूक झाली.

काही अंतर शत्रूला पळवून लावल्यावर हे सर्व परत फिरले. घोरी पराभूत होऊन पळाला म्हटल्यावर सारे राजपूत राजे आणि त्यांचे सैन्य निर्धास्त होऊन विखुरले आणि इथेच घात झाला !

जखमी सापासारखा घोरी पुन्हा

माघारी फिरला. आपल्या सैन्यास त्याने पुनश्च चालून जाण्याचा आदेश दिला. घोरीची फौज त्वेषाने चालून आली. परन्तु राजपुत्र सैन्य बेसावध आणि विखुरलेले होते. त्यांची दाणादाण उडाली. सेनापती चामुंडराय, हमीर हाडा, समरसिंह आदि वीरांनी पराक्रमाची शर्थ केली पण अखेरीस ते धारातीर्थी पडले ! स्वत: पृथ्वीराज मुहम्मद घोरीच्या हाती सापडला ! घात झाला !

पृथ्वीराजाला कैद करून घोरीनं लगेचच चाहमानांच्या अमेरवर स्वारी करून ते जिंकले. तिथे निरपराध स्त्री-पुरुषांची निर्घृण कत्तल मांडली. हिंदूंच्या मंदिरांवर आणि देवदेवतांच्या मूर्तींवर घणाघाती घाव घालून मुहम्मद घोरी 'गाझी' बनला ! आणि 'शरणागताला जीवदान' देणारा आपल्या राजपूत बाण्यास जागणारा पृथ्वीराज बंदी बनला !

घोरीचे सैन्य आता दिल्लीवर चालून गेले. अजून पृथ्वीराजाच्या राणीवशावर मुहम्मद घोरीचे भ्रष्ट हात पडायचे होते. पृथ्वीराज कैद झाला आहे आणि कदाचित मारला गेला असावा ही बातमी संयोगितेला दिल्लीच्या राजमहालात आधीच कळली होती. एका क्षणाचाही विलंब न लावता संयोगितेने राजमहालाच्या उंच मनोऱ्यावरून 'जय हर' गर्जून उडी घेतली आणि देहत्याग केला. आपल्या राणीच्या पाठोपाठ दिल्लीतील शेकडो स्त्रियांनी यमुनेत उड्या टाकून 'जोहार' केला, म्लेंच्छांनी आपल्याला भ्रष्ट करू नये म्हणून !

कैदेत सापडलेल्या पृथ्वीराजाला आपले भवितव्य कळून चुकले. हा शूर राजपूत राजा पिंजऱ्यात अडकलेल्या सिंहासारखा असहाय्य, बेबस होऊन येरझारा घालताना काय विचार करीत असेल?

आपण अस्थानी दाखवलेल्या औदार्याचा त्याला पश्चात्ताप झाला असेल का? सापाला दूध पाजणाऱ्या आपल्या सद्गुण विकृतीची त्याला चीड आली असेल का? की क्षुल्लक कारणांसाठी आपापसात, भावाभावांत लढण्याच्या आपल्या सवयींबद्दल त्याला घृणा वाटली असेल? की परकीय शत्रू घुसला असताना आपण बेसावध राहिलो म्हणून तो जळफळला असेल स्वत:वरच?

मुहम्मद घोरीनं पृथ्वीराजाला बंदी बनवून गझनीला नेलं, तिथे त्याचे डोळे काढले.

पृथ्वीराजाचा परममित्र आणि त्याचा दरबारी भाट कवी चाँद बरदायी याला हे वृत्त कळताच तो मोठ्या हिंमतीने गझनीला घोरीच्या दरबारात गेला. भाट, चारण हे भारतीय परंपरेत अवध्य मानले जात आणि बहुधा भारतीयांची ही परंपरा मुसलमानांनीही मान्य केली असावी. म्हणूनच आपल्या भेटीला आलेल्या चाँद भाटास न मारता घोरीनं त्याला विचारलं -

'क्या चाहिए शायर? इतनी दूर तक क्यों आए हो?'

तेव्हा शीघ्रकवित्व असलेल्या चाँदभाटाने आपल्या खड्या पहाडी आवाजात वीररसयुक्त कवन सुरेलपणे गाऊन दाखविले आणि सांगितले.

'हे राजा, माझा स्वामी तुझ्या कैदेत सापडला आहे. त्याचा शेवट तू तुला हवा तसा करशील यात शंका नाही. परंतु हे वीरवर, माझी विनंती इतकीच की मलाही माझ्या स्वामीसमवेत तशाच प्रकारे ठार करावे !'

चाँद बरदायीची ही विलक्षण मागणी ऐकून घोरी आश्चर्यचकित झाला. या शूर, साहसी आणि स्वामीनिष्ठ सेवकाशी त्याने मनमोकळा संवाद केला. त्याला जवळ बसवून घेतले. त्यावेळी बोलता बोलता कवी चाँद बरदायीने सांगितले - ''राजा, आमच्या भारतीय धनुर्विद्येत ध्वनिवेधाची अद्भूत कला आहे आणि या कलेत माझा स्वामी तर अगदी निपुण आहे.' कवी चाँद पुढे म्हणाला - 'राजा तू तर त्याचे डोळे फोडून त्याला आंधळा बनवले आहेस. तरीपण केवळ आवाजाचा वेध घेऊन पृथ्वीराज किती अचूक नेमबाजी करतो, हे तू स्वत:च अनुभव !''

चाँदभाटाच्या या प्रभावी बोलण्यामुळे मुहम्मद घोरीलाही इच्छा झाली पृथ्वीराजाचे कसब पाहाण्याची !

चाँदभाटाच्या म्हणण्याप्रमाणे घोरीने खास दरबार भरविला. आंधळ्या पृथ्वीराजाला धनुर्विद्येचे कौशल्य दाखविण्यासाठी दरबारात पाचारण करण्यात आले.

निवडक निमंत्रितांसह, सरदारांसह आणि आपल्या परिवारासह सुलतान मुहम्मद घोरी स्वत: दरबारात हजर होता. शक्य तेवढ्या सावधगिरीनं पृथ्वीराजाच्या ध्वनिवेधी धनुर्विद्येचा प्रयोग करण्याची पूर्ण व्यवस्था करण्यात आली होती. दूरवर एकवीस

लोखंडी तवे हारीने टांगण्यात आले होते. हातात हातोडा घेऊन एक हुजऱ्या तिथे उभा होता.

चाँद बरदायी आपल्या अंध मित्राला – दिल्लीच्या भूतपूर्व सम्राटाला घेऊन दरबारात आला. तव्यांपासून दूर उभारलेल्या व्यासपीठावर आपले धनुष्यबाण सरसावून पृथ्वीराज उभा राहिला. उच्चासनावर बसलेल्या सुलतानानं नजरेनंच संमती दिलं अन् 'खेळ' सुरू झाला.

एका तव्यावर हुजऱ्यानं हलकासा नाद केला आणि तो नाद हवेत विरण्यापूर्वीच त्याचा वेध घेऊन पृथ्वीराजाचा बाण सूं सूं करीत सुटला. क्षणार्धात या तव्याची दोन शकलं झाली. मग पाहाता पाहाता खेळाला रंग चढला. तव्यावर नाद व्हावा आणि त्याचा अचूक वेध घेऊन पुढच्याच क्षणी तव्याची बाणानं शकलं व्हावीत असा तो अद्भुत खेळ दरबारी थक्क होऊन बघत होते. एक दोन... चार... सहा... एका पाठोपाठ एक नाद करणाऱ्या तव्यांची शकले करीत पृथ्वीराजाचे बाण सुटत होते ! नकळत सारा दरबार थक्क होऊन अंध पृथ्वीराजाच्या नेमबाजीची तारीफ करू लागला ! 'वाहवा ! बहोत खूब !' असे ध्वनी सर्व दिशांनी उठत होते. 'खेळ' पुढे सरकत होता. टाळ्यांचा गजर होत होता.

इतका वेळ बेसावधपणे बसलेला मुहम्मद घोरी ऊर्फ शाहबुद्दीनही आता या जल्लोषात नकळत सामील झाला. अभावितपणे तो पृथ्वीराजाची तारीफ करीत खुषीत म्हणत होता – 'बहोत अच्छे! बहोत खूब। शबास शबास!'

इतक्यात पृथ्वीराजाच्या जवळ उभ्या असलेल्या चाँद बरदायीनं एक दोहा रचून संदेश दिला–

'हे माझ्या शूर मित्रा, समोर टांगलेल्या तव्यांतून उठणाऱ्या नादांच्या रोधाने तुझे बाण अचूक सुटत आहेत ! राजा, तुझ्यापासून सुमारे पन्नास हातांवरून त्या उच्चासनावरून 'बहोत खूब, बहोत अच्छे' असे शब्द येत आहेत. चढव तुझ्या प्रत्यंचेवर बाण आणि घे वेध त्या कंठाचा!'



...आणखी एक हलका नाद... तव्यावर पुढच्याच क्षणी त्या तव्याची शकले... उत्फुल्ल झालेला दरबार गौरवोद्गारांनी भरून गेलेला... उंच तख्तावर बसलेल्या सुलतानाचे बेभान होऊन 'वाहवा ! बहोत खूब !' गौरवोद्गार... आणि ते आवाज हवेत विरण्यापूर्वीच पुढचा बाण पृथ्वीराजाच्या ताणलेल्या प्रत्यंचेतून सूंऽऽ सूंऽऽ करीत सुटला... तो त्या कंठाचा वेध घेत आरपार गेला!

'या अल्लाऽऽ' चा अखेरचा भेसूर चीत्कार... आणि सारा दरबार भयचकित... स्तब्ध !

पृथ्वीराजाच्या अखेरच्या बाणानं आपलं काम केलं होतं.


पुढच्याच क्षणी चाँद बरदायीनं आपल्या बरोबर आणलेल्या कट्यारीनी पृथ्वीराजाने स्वत:चे प्राण घेतले आणि पाठोपाठ स्वामीनिष्ठ चाँद बरदायीनेही प्राणार्पण केले. कवी चाँदची अंतिम इच्छा पूर्ण झाली होती– आपल्या स्वामीच्या समवेत प्राणत्याग करण्याची !

✻✻✻

**सुहासिनी देशपांडे**
३ पुण्यश्री अपार्टमेंट,
रस्ता क्र. ७, डहाणूकर कॉलनी,
कोथरूड, पुणे २९.

१९६३ साली 'आंतरभारती विश्वस्त निधीने' कवी वसंत बापट यांना एक वर्षाची प्रवासवृत्ती दिली. संपूर्ण भारताचा प्रवास करीत असताना लेखकाच्या मनात उमटलेली ललित चित्रे 'बारा गावचं पाणी' १९६६ साली प्रथमावृत्ती निघालेल्या या पुस्तकातील लेखन, आजही ताजे वाटते. कारण या प्रवासचित्रातून घडणारे 'भारतदर्शन' आजही तितकेच मनोहर आहे. त्याला काळाचा फारसा संदर्भ नाहीच.

या यात्रेमध्ये 'भन्नाट फिरायचे, पटेल तसे. अंगाला हजार डोळे असल्यासारखे ह्या देशाकडे पाहायचे. या देशातील सृष्टी निर्वेधपणे नजरेत साठवायची हा लेखकाचा हेतू ! मग हा प्रवास करताना गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, गोदा, कृष्णा अशा अनेक नद्यांची विविध रूपे लेखकाने न्याहाळली. इथली मंदिरे, लेणी, शिलालेख, नवी-जुनी शिल्पे, हे सर्व लेखकाने डोळे भरून पाहिले. त्यातून भूतकाळाची अनुभूती त्याने घेतली. देशातील राने, वने, विजने यांच्याबरोबरच इथल्या लहान लहान गावातूनही तो फिरला. इथली नगरे, गावे तेथील माणसे, त्यांचे जीवन, निसर्गाची विविध रूपे लेखकाला भावली. काही नगरे गर्भश्रीमंत, काही नवश्रीमंत, काही दरिद्री, काही चिरतरुण... प्रत्येकाचा वेगळा सूर वेगळा नूर, प्रत्येकाचा वेगळा गंध, वेगळा छंद लेखकाने अनुभवला. तरीही त्यात एक एकात्म संस्कृतीचा धागा त्याला गवसत गेला.



वाचलेच पाहिजे असे काही
बारा गावाचं पाणी
ले. वसंत बापट.

या देशभरच्या भ्रमंतीत उत्तरेकडील काश्मीर, कुलु मनाली, चंदीगड ते दक्षिणेकडील रामेश्वर, कन्याकुमारी पर्यंत अनेक गावे लेखकाने पाहिली.

काश्मीरच्या प्रवासात सर्वजण श्रीनगरमध्ये खूप वेळ घालवून मग पहेलगामला येतात. वास्तविक ते जास्त देखणं गाव ! पहेलगामचा रस्ता सुरुवातीला फारसा सुंदर नाही. पण अचानक हे देखणेपण या गावाच्या रूपात सामोरं येतं. एकमेव रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वसलेलं हे गाव ! स्वप्नातल्या नदीच्या पाण्याइतके स्वच्छ हसरे पाणी घेऊन वसलेले पहेलगाम पाहात असताना, लेखकाला गुहागर आठवते. हे गाव कसे तर पिस्तुलबाज अमेरिकन चित्रपटात दिसते तसे सुंदर ! लाकडी पट्ट्यापट्ट्यांची घरे, घोडी, आजूबाजूचे विलक्षण सुंदर रान, थंडगार, स्वच्छ पाण्याने वाहाणारी लिदार नदी निर्झरिणीसारखी नाजुक दिसते.

मनालीच्या नावातच लेखकाला लाडीक भाव दिसतो. ज्यांना शांतता हवीये त्यांनी मनालीला हिमालयाच्या कुशीत जावे. ना तेथे प्रेक्षणीय वास्तूंना निसर्गाचा रुद्रावतार. निर्झरासारखी नदी, साधी देवळे, बैठी घरे, साधासाच बाजार. आगेमागे उंच चढण असलेले डोंगर, जिथे तिथे देवदारांची घनगर्दी. डोक्यावर रसरशीत सफरचंदाच्या बागा, डोळ्यात मिस्कील हासू असणारे, अंगात भरड लोकरी कपडे घातलेले तिथले धनगर, तिथली गोंडस पोरे आणि कोकरे ! तिथे नुसते राहावे, हिरवे-निळे रंग मनावर माखावे आणि धनगराच्या पोराने कोकरू धरावे तशी मनाली आपल्या छातीशी धरून परतावे.

मोठ्या जिद्दीने, कौशल्याने वसवलेल्या आखीवरेखीव चंदीगड-मध्ये लेखकाला जुन्या खानदानीपणाचा अभाव जाणवतो. तरीही तेथील शानदार रस्ते, घाटदार घरे यांनी हे नगर कसे टापटीप आहे, याचे लेखक वर्णन करतो. तिथले विद्यापीठ, विधानसभा, न्याय मंदिर पाहाताना हे विशेषत्वाने जाणवते. हे स्वच्छ, सुंदर शहर म्हणजे भुईवर नुकताच उगवलेला एक अंकुर.

दार्जिलिंग म्हणजे पहाडांची देखणी राणी. तिथले पर्वत, बर्फ, उंच देवदार, पाइन वृक्ष अन् चढ उतारांचे टुमदार शहर आणि नेपाळी, भूतानी इ. लोकांचे चित्रमय समाज, गोड हिवाळा पिऊन गोबऱ्या गालांचे लोक. तिथले चहाचे मळे, तिथली उषा, तिथून दिसणारी कांचनगंगेची झळझळीत मुद्रा हा लेखकाला अविस्मरणीय अनुभव वाटतो.

दिसमास गेले तरी पाँडेचेरीचा फ्रेंच संस्कृतीचा गंध गेला नाही; पण तरीही भारतीयत्व टिकून असलेली

कॉकटेल पॉण्डेचरी लेखकाच्या स्मरणात राहाते ती, अरविंदाश्रमामुळे. इथली निरोगी मुले-मुली लेखकाच्या मनाला मोह घालतात.

'रामेश्वर'ला प्राप्त झालेले बकाल तीर्थस्थानाचे रूप लेखकाला विषण्ण करते. मग लेखकाला म्हणावेसे वाटते, 'रामेश्वर, तू कोठे रे गेला असशील?' याउलट कन्याकुमारीचं !! तीन समुद्रांचा संगम चांदण्या-रात्री कवीच्या मनाला वेडावून टाकतो.

मध्यप्रदेशातील 'मांडू'चे गूढ निसर्गरूप, तिथले इतिहाससंपन्न महाल, देवळे पाहाताना लेखकाला इतिहासाचे स्मरण होते. उदेपूर येथील सुंदर सरोवरे, तीरावरचे राजवाडे, तिथले राजस्थानी लोक लेखकाला स्मरतात.

जयपूर म्हणजे राजा जयसिंगाला पडलेले एक स्वप्न. अगदी जनानी, खानदानी सौंदर्याची नगरी. इथले राजवाडे, इथला रंगीबेरंगी बाजार, कलेची जोपासना करणारे कारागीर, तिथल्या मानवनिर्मित सौंदर्याची ओळख करून देतात.

कोणार्कच्या जगप्रसिद्ध सूर्य मंदिराबरोबरच लेखकाला भावतो तिथला सळसळणारा समुद्र, मऊसूत वाळूचा रेशमी किनारा. सूर्यमंदिरातील कलात्मक शिल्पांचे वर्णन लेखकांचे विस्ताराने केलेले आहे.

काशीचा विश्वेश्वर, तिथली गंगा, तेथील प्राचीन संस्कृती यामुळे लेखकाला ती जणू कथा-कहाण्यांमधली आटपाट नगरी वाटते.

पुस्तकातील शेवटच्या प्रकरणात लेखक म्हणतो, ''या गावांचे वेगवेगळे पाणी मला दिसले. मी मनाची कावड भरून घेतली. डोळ्यांच्या शिंपलीत ते मावेना. अशा वेडाला उतारा एकच, हे वेड वाटून द्यावे, वाचकांमध्ये।''

ही या पुस्तक लेखनामागची उत्कट ऊर्मी ! जेवढे राज्यांच्या सीमा उल्लंघून जावे तेवढे तट माणूस मोडून टाकतो. जेवढी क्षितिजे तो छेदतो तेवढ्या त्याच्या शृंखला तुटतात. जिकडे जातो तिकडे त्याला भावंडे दिसतात. जमेल तेथे तो खूण जमवतो. मिळेल ते पाणी पितो. बारा गावचे पाणी पितो, म्हणजे वारा पितो, जन्मभर वासरासारखे बागडण्यासाठी !

लेखकाच्या साक्षीने प्रत्यक्ष नाही तरी अप्रत्यक्ष हे वारे तुम्ही प्या। आणि सुजला, सुफला मलयज शीतला अशा आपल्या मातृभूमीचे हे शब्ददर्शन घेऊन, जेव्हा तुम्ही स्वत: प्रवास कराल तेव्हा ही स्मरणे तुम्हाला नक्कीच आठवतील हा विश्वास आहे.

***

**बारा गावचं पाणी**

**ले. वसंत बापट** साधना प्रकाशन

किंमत ५० रु. पृष्ठसंख्या ११२

## हसा हसा



* गणिताच्या बाईंनी विचारलं, ''राघू, तुझ्यापाशी दहा रुपये आहेत, त्यातले मी पाच रूपये मागितले, तर तुझ्याकडे किती रुपये शिल्लक राहतील?''

**राघू –** दहाच्या दहा

**बाई –** अरे, मी त्यातले पाच रुपये मागितल्यावर तुझ्याकडे दहा रूपये कसे शिल्लक राहतील? त्यातले पाच रूपये कमी नाही का होणार?''

**राघू –** अहो, तुम्ही भले पाच रुपये मागाल, पण मी तुम्हाला पाच रूपये दिले तर ना?



* पप्पूनं विचारलं, ''बाबा, 'आकाशवाणी' व 'दूरदर्शन-केंद्र' ही दोन्हीही अगदी उंचावरच का हो असतात?''

वडिलांनी उत्तर दिलं. ''आत्यंतिक रटाळ कार्यक्रम चालू असताना, चिडून प्रेक्षकांना किंवा श्रोत्यांना त्यांच्यावर दगड किंवा अंडी फेकता येऊ नयेत म्हणून.''

# मोठा दिवस-छोटा दिवस


- अरविंद परांजपे

दर वर्षी २१ मार्च आणि २३ सप्टेंबर रोजी, दिवस आणि रात्र समान अवधीचे आहेत असे आपण वाचतो किंवा ऐकतो. पण त्या दिवशीची सूर्योदय व सूर्यास्ताची वेळ आपण बघितली तर उत्तर काही वेगळंच मिळतं.

खरंतर विश्वात कुठल्याही ताऱ्याच्या कुठल्याही ग्रहावर एकाच दिवशी सर्वत्र दिवस आणि रात्र समान अवधीचे असणं शक्य नाही. ते का हे आज आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करूया. ही चर्चा आपण सोईसाठी पृथ्वी आणि सूर्य यांच्या संदर्भात करूया.

तर आधी २१ मार्च आणि २३ सप्टेंबर रोजी दिवस आणि रात्र समान अवधीचे असतात हा (गैर) समज का, ते जाणून घेऊया. पृथ्वीचा अक्ष तिची सूर्याभोवती परिक्रमा करण्याच्या कक्षेला, ६६.५ अंशांनी कललेला असल्यामुळे +२३.५ ते −२३.५ या अक्षांशाच्या वर वर्षभरात वेगवेगळ्या दिवशी सूर्याची किरणे लंब असतात तर अन्यत्र सूर्याची किरणे नेहमीच तिरकी पडतात.

२१ मार्च आणि २३ सप्टेंबर या दोन दिवशी सूर्याची किरणे विषुववृत्तावर लंब असतात. पृथ्वीच्या विषुववृत्ताची पातळी तिच्या अक्षाला लंब असल्यामुळे, या दोन्ही दिवशी सूर्याची किरणेपण पृथ्वीच्या अक्षाला लंब असतात आणि म्हणून या दोन्ही दिवशी पृथ्वीचे उत्तर आणि दक्षिण गोलार्ध समान प्रमाणात सूर्यप्रकाशात असतात, असा समज आपण करून घेतो. (आकृती क्रमांक १ पाहा)




आणि तरीसुद्धा उत्तर आणि दक्षिण ध्रुव या दोन बिंदूंवर काय होतं ते सांगण्याचं आपण सोईस्करपणे टाळतो, असो. २१ मार्च आणि २३ सप्टेंबर या दोन दिवसांच्या सुमारास आपल्याला दिसणाऱ्या सूर्याच्या बिंबाचा केंद्र एका विशिष्ट वेळी वैषुविकवृत्तावरून जातो, या बिंदूंना वसंत संपात आणि शरद संपात बिंदू म्हणतात. (वैषुविकवृत्त म्हणजे आकाशातील विषुववृत्त समजावे.)


दिवस आणि रात्र यांच्या परिभाषांचा विचार करता, एका विशिष्ट स्थानासाठी सूर्याचा प्रत्यक्ष प्रकाश जेव्हा आपल्याला पहिल्यांदा दिसतो तेव्हा रात्र संपून आपल्या दिवसाला सुरुवात होते आणि मग सूर्याची शेवटची प्रकाशकिरणं दिसेपर्यंत दिवस असतो. त्यानंतर रात्र होते. ह्यात संधीप्रकाशाला विचारात घेतलेलं नाही. अर्थात वायुमंडलात ढग आल्यामुळे सूर्योदय (किंवा सूर्यास्त) न दिसण्याचा, दिवसाचा काळ ठरवण्याशी काही संबंध नाही.

आता सूर्य हा एक बिंदूमात्र प्रकाशस्रोत नाही. त्याला आकार आहे व तोही बराच मोठा आहे (अर्ध्या अंशाचा), त्यामुळे सूर्याची पहिली किरणं आपल्यापर्यंत पोहोचल्यापासून ते संपूर्ण सूर्य क्षितिजावर दिसेपर्यंत, विषुववृत्तावर जवळ जवळ २ मिनिटांचा अवधी लागतो. इथून जसे आपण उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाकडे जातो तसा हा अवधी पण वाढत जातो.

एवढंच नव्हे तर सूर्याच्या प्रकाशाचं पृथ्वीच्या वायुमंडलात वक्रीभवन होतं आणि आकृती क्रमांक दोनमध्ये दाखविल्याप्रमाणे (आकृती पुढे पाहा.) सूर्याची किरणं, सूर्य प्रत्यक्ष क्षितिज रेषेच्या वर येण्याअगोदरच आपल्याला दिसायला लागतात. प्रकाश जेव्हा एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जातो तेव्हा त्याचं वक्रीभवन होतं. बादलीत बुडवलेल्या काठीचं थोडं वर दिसणं हे प्रकाशाच्या वक्रीभवनाचं उदाहरण, आपल्या परिचयाचं आहे.

सूर्याचा स्वत:चा आपल्याला दिसणारा आकार आणि त्याच्या प्रकाशाचे पृथ्वीच्या वायुमंडळात वक्रीभवन, या दोन्हीमुळे सूर्य आपल्याला क्षितिजाच्या रेषेत येण्याच्या जवळजवळ ३.३ मिनिटं आधी दिसतो आणि मग तो एवढाच वेळ क्षितिज रेषेच्या खाली गेल्यावरही दिसत राहातो.

आणि म्हणून कुठल्याही एकाच



आकृती २

दिवशी जगभर सर्वत्र बारा तासांचा दिवस आणि बारा तासांची रात्र कधीच नसते. वेगवेगळ्या अक्षांशावर मात्र वर्षातून दोन तारखा अशा येतात की त्यादिवशी अक्षांशावर दिवस आणि रात्र १२ तासांचे असतात. पुण्याच्या अक्षांशावर ह्या तारखा १३ मार्च आणि २९ सप्टेंबरच्या जवळपास येतात.

आता इथेही अपवाद आहे. खुद्द विषुववृत्तावर मात्र दिवस हा रात्रीपेक्षा नेहमीच मोठा असतो. वर्षभरातल्या रात्रींच्या तासांची बेरीज तेवढ्याच काळातील दिवसांच्या तासांच्या बेरजेपेक्षा ४२ तासांनी कमी असते.

मी अजून २१ जून आणि २३ डिसेंबर रोजी दिवस आणि रात्र यांच्या तासाबद्दल चर्चा केलेली नाही; कारण ते तुम्हीच शोधून काढायचे आहे. मुलांनो, आजपासून तुम्ही आपल्या नोंदवहीत रोजच्या सूर्योदयाची आणि सूर्यास्ताची वेळ लिहा. मग सूर्यास्ताच्या वेळेतून सूर्योदयाची वेळ वजा करून दिवस किती तासांचा होतो ते लिहा. अर्थात २४ वजा दिवसांचे तास म्हणजे रात्रीचे तास. आता बघा बरं कुठल्या दिवशी दिवस अन् रात्र समान अवधीचे आहेत ते!

पुण्याची मुलं म्हणतील की मी हे उत्तर त्यांना आधीच दिले आहे. पण मी लिहिले आहे ते खरं कशावरून? तुम्हाला ते पडताळून बघायला नको?


बरं, आपला हा छोटासा प्रकल्प आपल्याच शहरापुरता का ठेवायचा? तुम्हाला काही वर्तमानपत्रातून इतर शहरांतील सूर्योदयाच्या आणि सूर्यास्ताच्या वेळा मिळू शकतील. तसेच तुमच्या दुसऱ्या शहरातल्या मित्रांनाही तुम्ही त्यांच्या शहरातील वेळा विचारू शकता.

तुमच्या माहितीसाठी गंमत म्हणून आणखीन काही आकडे :– ९० अंश रेखांश पूर्व आणि ८९.५ अक्षांश उत्तर इथे (उत्तर ध्रुवाच्या अगदी जवळ) १९.३.२००० रोजी सूर्योदय भारतीय वेळेप्रमाणे सकाळी २:५३ ला झाला. पण त्यानंतर तिथे सूर्यास्त झालेला नाही. तिथे आता सूर्यास्त २३ सप्टेंबर रोजी भारतीय वेळेप्रमाणे २१:४५ ला होईल आणि त्यानंतर या वर्षातला शेवटचा सूर्यास्त तिथे २५ सप्टेंबर रोजी १५:३७ ला होईल. त्यानंतर इथे सूर्यकिरणे १७ मार्च २००१ ला १०:४० वाजता पोहोचतील तर जेव्हा हे सहस्रक संपून पुढचे सहस्रक उजाडेल तेव्हा उत्तर ध्रुव अंधारात असेल तर याच्या अगदी उलट दक्षिण ध्रुवावर मात्र सूर्यप्रकाश असेल.

***

**– अरविंद परांजपे**
आयुका, पुणे विद्यापीठ, पुणे ७

## मर्यादा–कुंपण रेषा



वरील आकृती पाहा. ती एका वर्तुळाकृती शेताच्या नकाशाची आहे. गोविंद शेतकऱ्याच्या मालकीचे ते शेत आहे. परंतु आता तो शेतकरी म्हातारा झाला आहे. गोविंदला चार मुले आहेत. म्हणून त्याने या शेताचे चार समक्षेत्र भाग करावयाचे ठरविले आहे. दिलेले आकडे असणाऱ्या वृक्षांच्या संख्या दर्शवितात. शेत विभागण्यासाठी, गोविंदला कुंपणे लावावयाची आहेत व मर्यादा ठरवून द्यावयाच्या आहेत. प्रत्येक विभागामध्ये (क्षेत्रामध्ये) ४५ झाडांचा समावेश असणे आवश्यक आहे. तुम्हाला मर्यादा दाखविणाऱ्या कुंपण–रेषा काढता येतील काय?

(सोडविण्यास सोपे जावे, म्हणून अशी सूचना देतो, की सर्व नवीन मर्यादा–रेषा नकाशाच्या मध्यभागी येऊन मिळतात.)

# माय डायरी... न लिहिलेली

नीलिमा बोरवणकर



My uncle presented me a diary & suggested that, I should write down my experiences in it. But.... I was busy with my own routine... school, homework, exams etc... Truly speaking I didn't know, what to write?

Actually, I can write good essays in school, but diary...

सुरुवातीनंतर लिहायला सुचेना, मग डायरी बंद करून गेले झोपायला. झोप काही येईना... डोक्यात उलटसुलट विचारच यायला लागले. आज नेहानं कसं Cheating केलं, लीला मॅडमनं उगाच lecture दिलं, या असल्या गोष्टींनी किती त्रास होतो. disturb व्हायला होतं अन् याबद्दल बोलायचं तरी कुणाशी?

आता नेहाबद्दलचं सोनमला सांगितलं तर उगाच gossip केल्यासारखं होतं... नकोच ते.

...लीला मॅडमचं lecture म्हणजे ...extra reading करा, don't watch M.T.V., behave properly... शी ! याची complaint कुणाजवळ करणार? ममीजवळ? No chance, मॅडमचं परवडलं, इतकं lecture तीच देत बसेल. मॅडमचं बोलणं तिला १००% पटेल. यांना काय जातंय सांगायला – इथं वेळ कुणाला आहे. extra reading करायला, exam पुरता study करता करता दम लागतो. M.T.V. बघू नका म्हणे. घरातल्या T.V. वर शंभर चॅनेल्स. हे बघू नका न् ते नका... हे possible आहे का? मग आम्ही काय आता Cartoon Network बघायचं? सगळं कळतं म्हटलं आम्हाला !

... हाच तर problem आहे. मनातले हे विचार कुणाजवळ बोलायचे?... Yes ! Idea डायरीत लिहावेत...

Date :-

Time :-

I was very upset to see Neha going with Aniya. I felt betrayed... and above that Leela Madam scolded...

शी ! इतकी upset होऊन डायरी लिहायला बसले तर नीट लिहिता का येत नाही? दोन वाक्यात संपून जातंय लिहिणं... असं का व्हावं?... अरे, मी विचार करते आहे मराठीत, म्हणजे आपोआप केला जातोय आणि लिहायला बसले की सवयीनं English मध्ये लिहिलं जातंय. हं, इथेच गोंधळ उडतोय. पण असं का व्हावं बरं? माझं English चांगलंय. I am good at studies. I can understand, I can write good answers & naturally get good results... पण, ते तेवढ्यापुरतंच. something is lacking... खूप छोटी असतानाही असंच व्हायचं. शाळेतली ABCD पाठ करताना अवघड वाटायचं नाही. नुसती पोपटपंची... पाहा, पोपटपंची हा मराठीतला appropriate word कसा पटकन सुचला? तसं उत्तर पाठ करताना, एखादा शब्द आठवला नाही, की अडायलाच व्हायचं. अर्थात तेव्हा काही एवढा विचार केला नव्हता म्हणा कधी. आत्ता सुचतंय हे !

...तसं सगळं व्यवस्थित चाललंय. शाळेत आम्ही English, मराठी दोन्ही बोलतो. आमचं काही convent नाहीये. नुसतंच English medium. मैत्रिणींबरोबर मराठीच




बोलतो जास्त करून, पण शाळेच्या building मधल्या, मराठी medium च्या मुलांवर impression मारण्यासाठी मात्र English मारतो.

डॅडही माझ्याशी जास्तवेळा English बोलतो. ममीला नाही आवडत, आजीचं तर वेगळंच असतं... ''श्लोक पाठ कर, मराठी वाच''... वगैरे. श्लोक पाठ करणं ठीक, पण रोज म्हणायला जमत नाही बुवा. मराठी वाचायला मात्र फार वेळ लागतो. त्यापेक्षा English story books बरी. एकूण reading मधे वेळच फार जातो. त्यापेक्षा C.D. लावावी किंवा Discovery Channel वर तर किती information मिळते... हाच तर सगळा घोटाळा आहे. मी नक्की कुठे Stand होते, तेच कळत नाही. शाळेत खरंतर मला चांगले ८०% च्यावर marks मिळतात. English चा प्रश्नच नाही. पण ते Culture काही जवळचं वाटत नाही. त्यांच्या Stories मधले किती शब्द असे दूरचे वाटतात... त्यांच्याकडे आपण दूरवरून बघतोय, असा काहीसा feel येतो... showman pieman म्हणजे नक्की काय? त्यापेक्षा 'चल रे भोपळ्या टुणुक, टुणुक...' म्हटल्याबरोबर, तो भोपळा, ती आजीबाई छानपैकी डोळ्यापुढे उभी राहाते. आजोबा, आजी सांगतात त्या रामायण, महाभारत यासारख्या गोष्टी पटकन कळतात. जसं गोष्टीचं, तसंच गाण्यांचं ! ''येरे येरे पावसा, तुला देतो पैसा,' या गाण्याच्या शब्दांबरोबर, पावसात धूम भिजायला जावंसं वाटतं. English मधे मात्र बरोबर याच्या उलट. "Rain, rain go away, Little Jony wants to play." अरे जॉनी, एकदा पावसात हुंदडून बघ, मग कधी पावसाला go away, म्हणणार नाहीस, कळलं? बोलतानाची वेगळीच गंमत. मराठी बोलताना इतके English words तोंडात येतात नं की बास. आजी रागावतेच. 'सगळं नुसतं धेडगुजरी झालंय' म्हणून.

Yes ! I got the point.

आमच्यासारख्या English Medium मधल्या मराठी मुलांचं सगळंच नुसतं धेडगुजरी झालंय.

बोलताना, विचार करताना... मराठी. पण लिहायला गेलं की बोंब. प्रयत्नपूर्वक शुद्ध लिहावं लागतं. त्या शुद्धलेखनाची भीती वाटते. तुलनेनं English सोपं... पण English मध्ये स्वत:ला नीट express नाही करता येत. मनातले मराठी विचार English मधे reproduce करायला जरा अवघड वाटतं... पुन्हा मराठी विचारातही किती English words येतात. सगळं mixture वाटतं, ना मराठी pure, ना English दोन्ही complicated वाटतं... मला मराठीचा पुळका आहे? English चा राग, छे ! बिल्कुल नाही. जगभर English चा किती उपयोग होतो माहीत आहे मला. मराठी medium मधले English Conversation मधे कसला मार खातात, ते पाहिलंय की ! सातारच्या आत्याच्या शेजारी राहणारी रूपा नाही का कसली गोड दिसते, शिवाय height आहे 5'9". सगळे तिला Miss India मधे भाग घ्यायला suggest करतात. पण तिला English चा इतका complex आहे, की बास. अर्थात कधीही करता येतं म्हणा.

किती मोठ्या व्यक्ती पण मराठी medium मधे शिकलेल्या असतात. तरी ते वेगळं. ही सर्व मंडळी पुण्या-मुंबईत राहतात. नाही म्हटलं तरी शहरातला, cosmo वातावरणातला smartness वेगळाच. गावात फरक पडतो.

हाच तर सगळा गोंधळ आहे. शिक्षण basically either English मधून किंवा आपापल्या मातृभाषेतून. त्याचं English कच्चं, आमच्यासारख्यांची वेगळीच मजा. मराठी सगळं अगदी 'आपलं' वाटतं, फक्त express करता येत नाही. लिहिता येत नाही. मराठी medium वाल्यांना English लिहिता येतं, त्यांच grammer पक्कं असतं तर बोलण्याची बोंब, ती बीना एकदा गमतीनं म्हणाली होती, ''आम्हाला चहावर निबंध लिहायला सांगा, दोन पानं लिहू. पण चहा घेणार का?' असं विचारायची वेळ आली की तंतरलीच आमची, कसं विचारायचं?

'Will you have tea?' की

'Will you drink tea?' की

अजून काही वेगळंच. एकूण काय, शिक्षणाचं medium कुठलंही असो, सगळ्यांचा पोपट.

अरे व्वा ! एक मात्र झालं हं डायरी लिहिण्याच्या निमित्तानं मी I get to know myself.

***

**- नीलिमा बोरवणकर**
११ मधुबन 'बी' समर्थपथ,
कर्वेनगर, पुणे ५२


# करून तर पाहा !!

## फुलपाखरू

**साहित्य –** (समान आकाराचे २ चौकोनी कागद, तेली खडू, दोरा, फेव्हीकॉल, पांढरे, काळे, पिवळे, निळे मणी सजावटीसाठी.)

**कृती –** दोन सारख्याचमापाचे कागदाचे चौकोन कापून घ्या (रंगीत/ डिझाइन असलेलेसुद्धा चालतील.)

एका चौकोनाच्या AC ही बाजू तुमच्यासमोर समांतर ठेवून पंखा करताना जशा घड्या घालतात त्याप्रकारे कागदाला घड्या घालत जा. नंतर दुसरा कागदाचा तुकडा घेऊन चित्रात दाखविल्याप्रमाणे तिरक्या दिशेने टोकापर्यंत घडी घालत या. आता दोन्ही, घडी घातलेल्या कागदांच्या मध्य भागाला दोऱ्याने बांधा. आता जो भाग तिरकी घडी केला होता तो वरती व त्याच्या खाली चौकोनी सरळ घडी केलेला कागदाचा भाग एकत्र बांधा. फुलपाखरू तयार होईल. त्याच्या अंगासाठी आकृतीत दाखविल्याप्रमाणे थर्माकोल/ कार्डशीटचा भाग कापून त्या




जोडलेल्या भागाच्या मध्यभागी लावून टाका.

मोठ्या मुलांना यामध्ये कागदावर आरसे, टिकल्या, मणी लावणे किंवा हीच पद्धत हॅण्डमेड पेपरसाठी वापरून छान रंगवून तयार केलेला कागद वापरता येईल.

कापलेले चौकोनी कागद, रंगीबेरंगी खडूंनी गोळे, रेषा जसे आवडतील तसे रंगवा. रंगवून झाल्यावर तयार झालेल्या फुलपाखराला भिंतीवर/ दारावर चिकटवू शकाल.

***

**– संगीता केळकर**
'गीताली'पीवायसी कॉलनी,
डेक्कन जिमखाना, पुणे ४

---

## कोकीळ शिट्टी



**साहित्य –** एक साधी शिट्टी, एक प्लास्टिक पाईपचा १० सें.मी. लांबीचा तुकडा, एक चिंधी, एक बांबूची काडी, दोरा.

**कृती –** प्रथम शिट्टी पाईपमध्ये घट्ट बसवा. बांबूच्या काडीस चिंधी गुंडाळून एक दट्ट्या तयार करा. तो पाईपमध्ये सहजपणे आत गेला पाहिजे. चिंधी पाण्यात बुडवा, म्हणजे दट्ट्याचे कार्य सुलभ होईल. ही झाली आपली शिट्टी तयार !

**शिट्टी वाजवणे –** प्रथम कोकीळ हा झाडावर येतो तेव्हा ''मी आलो'' असा आवाज देतो. हा आवाज दट्ट्या तीन वेळा आत गेला की आपणांस काढता येतो.

**साद घालणे –** फुंकत असता दट्ट्या आत-बाहेर केला तर आपण कोकीळ जसा आवाज करून साद देतो तशी ही कोकीळ शिट्टी वाजविता येते.

ही कोकीळ शिट्टी वाजवून सुट्टीतील मजा लुटा. मला जर आपण भेटला तर ही शिट्टी मी तुम्हालाही जरूर वाजवून दाखवीन.

***

संकलन – मधुकर अभ्यंकर
प्लॉट नं.५३, तुळशीबागवाले कॉलनी, पुणे ९

***तुझ्यासारखे जावें वाटे उडत मजेने वरी । नेशिल का मज तुझ्या बिऱ्हाडी बसवुनि पंखावरी ।।***

# प्रोत्साहन



- संजीवनी बोकील

मुलांनो, आज सकाळी नेहमीप्रमाणे पेपर उघडला आणि वाचायला लागले. आतल्या पानावरच्या एका बातमीवर नजर गेली आणि खरं सांगू का, आनंदानं अगदी तुमच्यासारखंच नाचावंसं वाटलं. बातमी कुठली होती?...

हो, हो, सांगते, सांगते; मला जरा दम तर खाऊ द्या.

माझ्या एका विद्यार्थ्याला म्हणजे प्रफुल्लला कवितास्पर्धेत पहिलं बक्षीस मिळालं होतं. हा प्रफुल्ल फार गोड मुलगा. एकदा माझी कविता कुठेतरी छापून आली. त्याचं सुंदरसं कात्रण कापून ते एका रंगीत कागदावर डकवून त्यानं मला दिलं आणि हळूच म्हणतो कसा– 'बाई, मी पण काही कविता लिहिल्या आहेत.'

'अस्सं! मग दाखविल्या का नाहीस?'

'बाई, त्या काही खास नाहीत'

मला हसूच आलं. मी म्हटलं, 'अरे, एकदम अशा कविता खास होतील? आधी मोहोर येतो, मग बिटकीशी कैरी धरते, मग मोठी होते नि तिचा सुंदरसा घमघमणारा आंबा बनतो. लहान आहेस तू अजून ! तशीच तुझी कविताही ! जपलीस तर तुझ्याबरोबर मोठी होईल.'

मग लाजत लाजत का होईना कविता लिहिली की प्रफुल्ल ती मला किंवा त्याच्या दुसऱ्या सरांना दाखवायला लागला. आम्ही त्याला मार्गदर्शन केलं, अधिक चांगल्या पद्धतीने कवितेबद्दल विचार करायला लावला, भरपूर शाबासकी दिली, कुठे शालेय स्पर्धा असल्या की त्याची कविता तिथे पाठवायला सांगितली आणि आज याच प्रफुल्लला किती मोठं यश मिळालं ! प्रफुल्ल पेढे घेऊन आला; म्हणाला 'बाई, माझ्या वेड्यावाकड्या कवितांचंही तुम्ही कौतुक केलंत, अधिक चांगलं लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिलंत म्हणून हे यश मिळालं.'

मी म्हटलं, 'अरे, मी काही वेगळं केलं नाही. जे माझ्या आई-वडिलांनी, शिक्षकांनी केलं तेच मीही केलं. तूही मोठा झाल्यावर असंच करशील.'

मुलांनो प्रोत्साहनाची अशी सगळ्यांनाच गरज असते ! नाही का?

'वा ! काय छान खेळलास रे, तुझ्यामुळेच आपण जिंकलो' किंवा 'तुझा नाटकातला अभिनय पाहताना अगदी डोळ्यातून पाणी आलं गं!' किंवा 'काय छान दिसतोय हा ड्रेस तुला !' ही साधीच वाक्यं आहेत पण ऐकणाऱ्यांच्या मनात ती उत्साह, आनंद आणि अभिमानाची कारंजी फुलवतात. असं प्रोत्साहन द्यायला अगदी गुरूजी, बाई किंवा वडील-आईच व्हायला हवं असं नाही. तुम्ही तुमच्या मित्राचंही असं खरंखुरं कौतुक करू शकता की नाही.

आज तुम्ही शाबासकी देता आहात; उद्या तुम्हालाही शाबासकीच्या दोन गोड शब्दांची गरज वाटेल. कारण ही गरज सगळ्यांनाच असते. म्हाताऱ्या आजोबांपासून ते पहिले बोबडे बोल बोलणाऱ्या बाळापर्यंत ! लटपटती पावलं टाकली तरी त्याला जग जिंकल्याचा आनंद होतो. पण आपल्या या आनंदात, दुसऱ्यानंही सहभागी व्हावं, असं त्याला वाटतं. त्याची ही गरज त्याची आई ओळखते; कारण आई हा पहिला गुरू आहे. शिष्याला कशाची गरज आहे, हे कळलं नाही तर तो गुरू कसला?, आपल्या मुलाइतकी प्रिय गोष्ट आईजवळ दुसरी असते का?


ज्ञानेश्वरांनी स्वत:ला बालकाच्या रूपात आणि श्रोत्यांना आईच्या रूपात कल्पिले आहे. नवव्या अध्यायात ते म्हणतात –

*बाळक बोबडा बोली।*
*का वाकुडा विचुकीं पावलीं।*
*चोज करूनी माऊली।*
*रिझवी जोवि।।*

''ज्याप्रमाणे आपले बाळ काहीही बोबडे बोलले, वेडीवाकडी पावले टाकत चालले, तरी त्याची आई त्याचं कौतुक करते, त्याला आनंद वाटेल म्हणून शाबासकी देते; त्याप्रमाणे श्रोते हो, तुम्हीदेखील माझ्या या प्रयत्नाचे कौतुक करावे, प्रोत्साहन द्यावे अशी मी तुमच्याकडे विनवणी करतो.''

मुलांनो ज्ञानेश्वरीसारखा वंदनीय ग्रंथ लिहिणाऱ्या ज्ञानेश्वरांकडे किती विनय होता तेच यातून जाणवते ना? म्हणूनच इतरांना प्रोत्साहन द्या म्हणजे तेही तुम्हाला प्रोत्साहन देतील; ज्यामुळे ती गोष्ट करण्यातला तुमचा उत्साह वाढेल व ती गोष्ट आणखी उत्तमरितीने होईल.

– संजीवनी बोकील
विजयालक्ष्मी अपार्ट., फ्लॅट नं. १९,
पौड रोड, पुणे ३८.



# रेषांचा खेळ

- मल्हार अरणकल्ले

समोरच्या पुस्तकातील एक साधी आकृती कागदावर रेखाटण्याचा प्रयत्न करीत होतो आणि ते काही मनासारखे जमत नव्हते. अगदी जमत नव्हतेच असेही नाही; पण जे जमत होते ते अपुरे वाटत होते. ही आकृती म्हणाल तर तशी काही फार गुंतागुंतीची, कठीण अशी काही नव्हती. आकृती म्हणजे साधे लंबवर्तुळ होते. एका बिंदूपासून सुरू केलेली रेषा त्याच बिंदूला येऊन मिळेपर्यंतची तिची जी वळणे होती, तेथेच गडबड होत होती. सारी गाडी घसरायची ती प्रामुख्याने वळणांवरच.

लंबवर्तुळाची रेषा वळणांवरच फसत-घसरत होती. एवढेच नव्हे, तर ती मूळ बिंदूशी निमूटपणे मिळायलाही अनेकदा कुरकुरत होती. हे दोन बिंदू मिळवावे लागत होते, तेही बरीचशी ओढाताण करूनच. एका बिंदूपासून लंबवर्तुळाच्या आकाराने पुढे जाऊ लागलो की पहिल्या वक्राकार चढावर आणि नंतरच्या उतारावर बऱ्यापैकी तोल साधता येत होता; पण त्यापुढील वळण मात्र चुकत होते. बराच सराव झाला तेव्हा हे वळणही कसेबसे जमले; पण मग पुन्हा दुसऱ्या वळणावर गाडी अडू लागली. त्यात एक पथ्य होते, हे वळण हुबेहूब पहिल्यासारखेच व्हायला हवे. ते मात्र काही केल्या जुळेना. अखेर, हे प्रकरण थोडे बाजूला ठेवून दिले.

कागदांवर अनेक यशस्वी प्रयत्नांच्या रेषा उमटलेल्या होत्या. छानपैकी, प्रमाणबद्ध रेखाटलेले लंबवर्तुळ कसे असते, त्याची खूण मनात पक्की होती आणि कागदावरील आकारांची नकळत त्या खुणेशी तुलना केली जात होती. चांगले काय, योग्यकाय हे आपल्याला ठाऊक असतेच; आणि आपण बहुतेक सगळे हे चांगले-योग्य करण्याचाच प्रयत्न करीत असतो. कुठल्या तरी चढावर, उतारावर, वळणावर, खाचखळग्यावर गाडी घसरते आणि मग रेषा चुकते. एकदा चुकलेली रेषा काही वेळा सुधारता येतेही; पण काही चुकलेल्या रेषा सुधारण्याच्या पलीकडे जाण्या-एवढ्या ठळक झालेल्या असतात.

आपल्याला सगळ्यांनाच सरळ रेषांचे आकर्षण असते. त्याला एक कारण असावे. आपल्याला रेषा भेटतात त्या अगदी बालवयात, धुळाक्षरे गिरविताना. वही, पुस्तक पाटी यांच्या संगतीने फुलणारे जे वय असते, तेव्हा आपण या सरळ रेषांशी परिचित होतो. पट्टीने रेषा आखताना त्या अनेकदा तिरप्या होतात आणि मोठ्या-वडीलधाऱ्या मंडळींकडून आपले हात पकडून सरळ रेषा काढण्याचा मंत्र दिला जातो. सरळ रेषा हा अनेक आकारांपैकी एक आकार, असे म्हणता येईल. वह्या-पुस्तकांत, हिशोबाच्या नोंदीत सरळ रेषा आवश्यक असतात; पण सरळ रेषांच्या कोऱ्या वह्या आपण पाहू लागलो, तर पानांमागून पाने उलटून चटकन वह्या हातावेगळ्या करीत जाऊ; त्यात कुठे गुंतून पडणार नाही. एकच आकार पाहण्याचाही कंटाळा येतो. बदल आपल्याला वेगळाच आनंद देतो.

सरळ रेषांतून बनलेल्या आकृती आणि वेड्यावाकड्या, मुक्त धावणाऱ्या रेषांतून तयार झालेल्या आकृती, यांपैकी दुसऱ्या प्रकाराचे महत्त्व काही निराळेच असते; कारण चित्रे आकाराला येतात ती प्रामुख्याने दुसऱ्या प्रकारच्या रेषांतूनच. जीवनाची सुरुवात करताना आपल्याला शिकविल्या जातात त्या सरळ रेषा, नंतरच्या वाटचालीत क्वचितच भेटतात; किंबहुना या रेषांना विविध आकार मिळत जातात आणि त्यातूनच आयुष्य खुलत-बहरत किंवा भरकटत-ढकलत पुढे जात राहातं. अशा वेड्यावाकड्या, वळसे घेत जाणाऱ्या रेषा, हाच जीवनाचा

अग्रलेख असतो. या आलेखाचा तोल सावरण्याचे भान म्हणजे आयुष्य. माणसाचे आयुष्य म्हणजे तरी काय आहे? - एक प्रवासच. एका बिंदूपासून सुरू झालेला आणि पुन्हा फिरून त्याच बिंदूशी वेगळ्या स्वरूपात येऊन मिळणारा. पहिला बिंदू जन्माच्या सोहळ्याचा असतो आणि त्याच्याशी मिसळून जाताना तो अनंतात विलीन होण्याचा, विरून जाण्याचा क्षण असतो. एकच बिंदू; पण त्याची ही दोन रूपे. त्यातील अंतर तुम्ही कसे पार करता, ते महत्त्वाचे.

हे अंतर वळणांचे असते, चढ-उतारांचे, काट्या-कुट्यांचे खाचखळग्यांचे... असे विविध प्रकारांतून कापावे लागते. आयुष्य हाही एक रेषांचाच खेळ असतो. कधी सरळ रेषांचा, कधी वक्राकार रेषांचा; तर कधी एकमेकांत गुंतणाऱ्या रेषांचा.

✻✻✻

**- मल्हार अरणकल्ले.**
१०/२ गुरुजन सोसायटी,
कोथरुड, पुणे २९

## अनुभव गेल्या वर्षीच्या ग्रामीण परिचय शिबिराचा !

ज्ञान प्रबोधिनीद्वारा गेल्यावर्षीच्या दिवाळीच्या सुट्टीत तोरणा किल्ल्याच्या पायथ्याशी, निसर्गरम्य परिसरामध्ये ८ दिवसांचे ग्रामीण परिचय शिबिर योजले होते. मोकळ्या माळरानावर तंबू टाकून ८ दिवसांचे आम्ही सर्व ५ दिवस राहिलो. दिवसभर भरगच्च कार्यक्रम होते. त्यामध्ये ग्रामीण भागातील प्रश्न, तेथील संपत्ती, लोकसंस्कृती, जनजीवन, इ. बाबत गावात जाऊन गावकऱ्यांशी गप्पा गोष्टी करून, गटचर्चा-व्याख्यानांमधून आम्ही परिचय करून घेतला. रात्री खूप थंडी पडायची. मोकळ्या माळरानावर आळीपाळीने तंबूचे रक्षण करण्याचे कामही आमच्याकडेच होते. कोल्ह्याच्या कोल्हेकुईने रात्री चांगली भीती वाटायची पण मजा यायची. सकाळचे खेळ, गटकार्य, दुपारचे नदीतले पोहोणे, संध्याकाळी होणारे खेळांचे सामने, रात्रीची अनुभवकथनाची सत्रे, सगळं कसं रंगत जायचं. एक दिवस रात्री आम्ही सर्वांनीच चुली मांडून चक्क 'स्वयंपाक' केला. त्याची मजा काही औरच ! एका रात्री गावांमध्ये मुक्कामाला गेलो होतो. महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणांहून ५० जण आले होते त्यांच्याशी पण छान दोस्ती झाली. शेवटी तोरणा ते रायगडची झालेली डोंगरदऱ्यांमधली भटकंती तर मी कध्धीच विसरणार नाही ! आयुष्यात पहिल्यांदाच सलग ७-८ तास चाललो अन् तेही स्वत:चे सामान स्वत: घेऊन ! त्रास झाला पण नंतर त्याचे महत्त्व पटले. खूप आत्मविश्वास वाढला. अनेक चांगल्या सवयींना सुरुवात झाली. त्यातल्या सगळ्या नाही पण काही मात्र आजही टिकवून ठेवल्या आहेत. याही वर्षी मी या शिबिराला पुन्हा येणार आहे. महेन्द्रभाईंना मी त्याबाबत विचारले तर ते म्हणाले, **'या वर्षीचे शिबिर ३१ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या काळात असंच निसर्गरम्य परिसरात, मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्रपणे होणार आहोत.'** त्याची माहितीपत्रकं छात्र प्रबोधनच्या मुख्य अथवा स्थानिक कार्यालयात मिळतील. ती तुम्ही पण जरूर मागवून घ्या अन् यावर्षीच्या शिबिरात नक्की या ! तुमच्या मित्रांसह ! खूप मजा करू, नवीन अनुभव घेऊ ! ***मग येणार ना या वर्षीच्या शिबिराला !***

**<u>या पुस्तकाच्या छपाईस खालील शुभचिंतकांनी अर्थसाहाय्य केले -</u>** श्री. प्रविण ढोले, टेक्नोफोर-पुणे श्री. राजेंद्र कानडे-पुणे, विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्ट्स, प्रा.लि.-पुणे, डॉ.मुकुंद करंबळेकर-चाळीसगाव, **Adept Fluidyne Pvt. Ltd.,** Kothrud Industrial Estate-Pune 29, **SUNIKEM ENTERPRISES**-PUNE, **JAISONS ENGINEERING TECHNOLOGY**-PUNE, **डॉ. दिलीप पटवर्धन-सांगली, श्री.शिरीष पोंक्षे व श्री.प्रसाद पुरंदरे-पुणे, मे.ओम कन्स्ट्रक्शन्स, प्रोप्रा.माणिकराम हळबे.-पुणे ३०,** स्वस्तिक बिल्डर्स (अनिल लोढा, राजेंद्र गोठी), मखमलाबाद नाक्याजवळ-नाशिक, **डॉ.उदय भवाळकर, ए-१ पद्मपार्क-पुणे ९, चि. हृषिकेश कुलकर्णी-पुणे, मोकाशी कुटुंबीय,** डॉ.रसिक शेटिया, कोमल नर्सिंग होम, येरवडा-पुणे, परांजपे पोल्ट्री फार्म, दुर्गामाता मंदिरामागे-सांगली., **कै.सौ.सरोजिनी बळवंत आगरकर यांचे स्मरणार्थ,** महाराष्ट्र ॲग्रिकल्चर बायोटेक-पुणे ३०, **कौशिक एंटरप्रायझेस् -** पुणे ३८, **ज्ञान प्रबोधिनीचे शुभचिंतक.**

**आम्ही या सर्वांबद्दल कृतज्ञ आहोत !**

## ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक प्रकाशने

**१. व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत**
(सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी समग्र मांडणी)

**२. नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत?**
(प्रकल्पासंबंधी अनुभवातून लिहिलेले पुस्तक)

**३. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास**
(ललित लेखन कसे करावे याचा मूलमंत्र देणारे पुस्तक)

**४. कल्पक बनू या**
(कल्पनाशक्ती वाढविण्याची गुरुकिल्ली सांगणारे पुस्तक)

**५. वेध यशाचा**
(स्वत:चा अभ्यास स्वत: करण्यासाठी उपयुक्त तंत्रे)

**६. असे घटते सुंदर अक्षर**
(हस्ताक्षर सुधारण्यासाठी कृतिपुस्तिका)

**७. हसत खेळत बुद्धिविकास**
(बुद्धिच्या विविध पैलूंसाठी विविध खेळ)

**८. बुद्धीवैभव**
(बुद्धीचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक)

**९. प्रज्ञाबोध मालिका–५ पुस्तकांचा संच**
(राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेसाठी उपयुक्त–दोन्ही माध्यमांमध्ये)

**१०.छंद आकाशदर्शनाचा**
(आकाशातील नक्षत्रे–ताऱ्यांचा परिचय)

**११.गिर्यारोहणगाथा**
(गिर्यारोहणाची प्राथमिक माहिती व प्रेरणा देणारे पुस्तक)

**१२.प्रबोधन गीते–भाग२ ध्वनिफीत**
(ज्ञान प्रबोधिनीतील स्फूर्तीगीते)

**१३.कथासंग्रह–दरवळ, बहर, मृदगंध, मोहोर**
(छात्र प्रबोधनमधील निवडक कथांचे संकलन)

**१४.वाचलेच पाहिजे असे काही.**
(वाचनीय पुस्तकांचा परिचय)

**इतर अनेक संग्राह्य प्रकाशने उपलब्ध !**

**संपर्क पत्ता :**
**छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,**
**पुणे ४११०३०, (०२०)४४७७६९१, ४४७८०९५**

पोस्टडाक-छापील पुस्तक (Book Post-Printed Book)

# वेद मंत्राहून आम्हा,
# वंद्य वन्दे मातरम्

माऊलीच्या मुक्ततेचा, यज्ञ झाला भारती
त्यात लाखो वीर देती, जीवितांच्या आहुती
आहुतींनी सिद्ध केला, मंत्र 'वन्दे मातरम्' ॥१॥

वन्दे मातरम्

याच मंत्राने मृतांचे, राष्ट्र सारे जागले
शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले
शस्त्रहीना एक लाभे शस्त्र 'वन्दे मातरम्' ॥२॥

निर्मिला हा मंत्र ज्यांनी, आचरीला झुंजुनी
ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाऊनी
गा तयांच्या आरतीचे गीत 'वन्दे मातरम्' ॥३॥

कवि - ग.दि.माडगूळकर

**'शैक्षणिक साहित्य-छापील मजकूर'**
Book Pages containing printed book
पुस्तक/पोस्ट-डाक

हेपुस्तक 'शैक्षणिक साहित्य-छापील मजकूर' या शीर्षकाखाली Book packet containing books, printed matter या प्रकारांतर्गत पोस्टात टाकलेअसून तशी पुण्याच्या मुख्य पोस्ट ऑफिसमधून ५०पैशाच्या तिकिटात पोस्टात टाकण्याची खातरजमा करुन घेतली आहे. सर्व ठिकाणची पोस्ट कार्यालये, पोस्टमास्टर, पोस्टमन व वाचक यांनी याची नोंद घ्यावी व ५० पैशांची तिकिट लावलेलेअसल्यास कोणताही दंड आकारु नये / देऊ नये.

किंमत : रु.१०/-
संपर्क पत्ता : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे411030. ☎(०२०)४४७७६९१, ४४७८०९५